
# पाणी, आरोग्य आणि स्वच्छते संदर्भातील माहिती शिक्षण व वर्तन बदल संवाद साहित्याच्या उपयोगासंबंधी

## मार्गदर्शिका




**Developed by:**

Innovations
Redefining Learning & Communication for Change

**Supported by:**

सुजल महाराष्ट्र – निर्मल महाराष्ट्र
पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था

**Facilitated & supported by:**

unicef
unite for children

# मनोगत

स्वच्छता, पाणी व आरोग्य **WASH** हा असा कार्यक्रम आहे की, ज्यात वर्तन बदलाला अनन्य साधारण महत्व आहे. शौचलयाचे बांधकाम आणि वापर म्हणजे केवळ बांधकाम किंवा भौतिक निर्मिती नसून ही अनुकूल बदलाची सामाजिक प्रक्रिया आहे. वास्तविक निर्मल भारत अभियान आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात माहिती, शिक्षण आणि संवाद यांच्याशी निगडीत उपक्रमांना महत्व देण्यात आले आहे. तथापि, या सर्व उपक्रमांचा स्वच्छता व वैयक्तिक आरोग्यामध्ये सार्वजनिक प्रमाणक तयार करणे, पाणी पुरवठा प्रकल्पांचे कार्य आणि दुरूस्ती **(O&M)** आणि पेयजलाच्या दर्जाचे नियंत्रण यांसदर्भात अपेक्षित बदल घडविण्याच्या दृष्टीने फारसा परिणाम झालेला दिसत नाहीं.

अलिकडेच केंद्र सरकारच्या पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाकडून युनिसेफच्या सहकार्याने विकसित केलेल्या राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद धोरण आराखडयात संडासांचे बांधकाम आणि वापर, बाल विष्ठेची सुरक्षित विल्हेवाट, महत्वाच्या वेळेस हात धुणे व पेयजलाची सुरक्षित हाताळणी आणि साठवणूक या चार महत्वाच्या मुद्यांसंबंधी शाश्वत वर्तन बदलाच्या गरजेला प्राधान्यायने मांडले आहे.

राष्ट्रीय संवाद आराखडयात भर दिलेल्या या चारही मुद्यांचा समावेश करून युनिसेफ, मुंबई आणि पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था **WSSO** यांनी संयुक्तरित्या निष्कर्षप्रद संशोधनाच्या आणि क्षेत्र चाचणीच्या आधारे स्वच्छता, आरोग्य, मासिक पाळीच्या काळातीत स्वच्छता, धन आणि द्रव कच-याचे व्यवस्थापन, पेयजलाची गुणवत्ता आणि गावातील पाण्याची सुरक्षितता यासारख्या महत्वाच्या विषयातील वर्तन बदल आणि संवाद साहित्यासाठी लखनौस्थित संवाद क्षेत्रात काम करणा-या इनोव्हेशन या संस्थेची मदत घेवून तीस विविध प्रकारची साधने विकसित केली आहेत.

स्वच्छता व पाणी या क्षेत्रात कार्यरत असणा-या जिल्हा व तालुकास्तरावरील अधिका-यांसाठी ही प्रशिक्षण मार्गदर्शिका तयार करण्यात आलेली आहे. त्यांना वर्तन बदल संवादासाठी तयार केलेल्या या सर्व साधनांच्या वापरासंबंधी आणि या आधारे पुर्ननिर्मिती करण्यासंबंधी आवश्यक ती माहिती उपलब्ध व्हावी हा या मागचा हेतू आहे. त्याच सोबत आंतरव्यक्ती संवादाच्या कल्पक वापरासंबंधी प्रेरित करण्यात आणि राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद धोरण आराखडयात अधोरेखीत धोरण आणि कृती आराखडा विकसित करण्यासाठी देखील राज्य आणि जिल्हापातळीवर ही मार्गदर्शक पुस्तिका उपयुक्त ठरेल.

# मनोगत

इन्होवेशन संस्थेचे हे काम खरोखर प्रशंसनीय आहे. श्री. मनीष कुमार यांचे नेतृत्व आणि त्या नेतृत्वाला योग्य प्रतिसाद देणारे मुंबई आणि लखनौ मधील त्यांचे सहकारी हे कौतुकास पात्र आहेत. हे उपयुक्त काम करण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आभारी आहोत. निष्कर्षप्रद संशोधन, क्षेत्रचाचणी आणि संवाद साहित्य निर्माण करण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे जे भरीव योगदान मिळाले आहे त्यामुळे ही निर्मिती अधिक परिणामकारक व परिपूर्ण होवू शकली. या साहित्यातील विषय आणि भाषेसंबंधी यथायोग्य माहिती व प्रतिसाद दिल्याबद्दल आम्ही निर्मल ग्राम निर्माण केंद्र नाशिक, ग्रामपयोगी विज्ञान केंद्र वर्धा, आप्पासाहेब पटवर्धन सफाई तांत्रिक निकेतन व विदयालय पुणे, सॅकेड औरंगाबाद, प्रायमूव्ह पुणे आणि लातूर व चंद्रपूर जिला परिषद यांचे विशेष आभार मानतो.

मला मनापासून वाटते की, पाणी, स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रातील वर्तन बदलाला प्रवृत्त करणा-या या तीस प्रकारच्या कल्पक साहित्याचा राज्य, जिल्हा आणि गावपातळीवर पुढील काळात खूप चांगला उपयोग केल्या जाईल आणि हे साहित्य महाराष्ट्र राज्याला निर्मल महाराष्ट्र, सुजल महाराष्ट्र बनविण्यात उपयोग सिद्ध होईल.

युसुफ कबीर,
**WASH** अधिकारी, युनिसेफ, मुंबई
डिसेंबर - २०१२

# राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद धोरण आराखडा २०१२-२०१७

राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद धोरण आराखडा निर्मल भारत अभियानाचा अंतर्भूत भाग आहे, निर्मल भारत अभियानाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी व्यापक प्रमाणावर आंतरव्यक्ती संवाद आणि माहिती शिक्षण संवादाच्या असणा-या गरजेला पूर्ण करण्याच्या प्रयत्नात हा आराखडा सहाय्यभूत ठरणारा आहे. भारतात अजूनही ६० दशलक्षापेक्षा जास्त लोक उघडयावर शौचाला जातात. वर्ष २००० पासून प्रतिवर्ष शौचालय वापरणा-या लोकांच्या संख्येत २० लाखाने वाढ होत आहे. उघडयावर शौचविधी करणा-या लोकांची संख्या आणि त्यांच्या जोडीला अंशतः होणाऱ्या लोकसंख्या वाढीच्या पार्श्वभूमीवर बदलाची ही गती खूपच कमी वाटते. १९९० ते २०१० या बीस वर्षाच्या काळात उघडयावर शौच करणाऱ्या लोकांचे प्रमाण जे ७५% वरून ५०% झाले असले तरी प्रत्याक्षात अशा लोकांची संख्या मात्र जवळपास तेव्हढीच राहीली आहे.

सर्वसामान्य लोकांमध्ये शौचालयाचा वापर, लहान मुलांच्या शौचाची सुरक्षित विल्हेवाट आणि आरोग्य यांच्यातील सहसंबंधाबाबत जागृतीचा आभाव आहे याचसोबत माहिती, ज्ञान आणि स्वच्छतेच्या सवयींची अंमलबजावणी यात लक्षणिय फरक आहे आणि निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त गावांना मिळालेला हागणदारीमुक्त गावाचा दर्जाही घसरला असल्याचे अलिकडच्या काळातील अभ्यासाद्वारे उघड झाले आहे.

वैयक्तिक वर्तनात शाश्वत बदल घडवून आणण्यातील असर्थता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसह समाजाचा अपुरा सहभाग गावांसाठी हागणदारी मुक्त दर्जा प्राप्त करण्यातील मोठा अडसर असल्याचे समोर येत आहे. दुसरीकडे बांधकामाचा निकृष्ट दर्जा आणि त्यातील तांत्रिक दोष हे घटक देखील एकूण अडथळयात भर घालणारे ठरत आहेत. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आणि शौचलयाची मागणी वाढविण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता असते. सद्य:स्थितीत त्याचीही कमतरता आहे. या सर्व अडचणींमध्ये भर म्हणजे कुटुंबस्तरावर आपल्याकडे शौचालय असावे अशा उत्कट इच्छेचाही अभाव दिसून येतो.

वरिल पार्श्वभूमीवर स्वच्छता मंत्रालयाने युनिसेफच्या सहकार्याने राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद धोरण आराखडा २०१२-२०१७ विकसित केला आहे. लोकांकडे शौचालयाची उपलब्धता, त्यांच्याकडून त्याचा सातत्यपूर्ण वापर, जेवणापूर्वी, जेवण बनवण्यापूर्वी शौचाहून आल्यावर आणि बाळाची शी धुतल्यानंतर साबणाने हात स्वच्छ धुण्यासंबंधीच्या अनुकूल सवयी रूजवणे हे या आराखडयाचे ध्येय आहे. समाजात स्वच्छतेसंबंधी जागरूकतेचा स्तर वाढवून वर्तनबदल घडवून आणण्याचा उद्देश यामागे आहे. हा आराखडा स्वच्छता आणि आरोग्यासंबंधी पुढील चार महत्वाच्या वर्तनांवर लक्ष केंद्रित करणारा आहे.

- शौचालयांचे बांधकाम आणि वापर
- लहान मुलांच्या शौचाची सुरक्षित विल्हेवाट
- शौचास जावून आल्यावर, जेवणापूर्वी आणि लहान मुलांचे शौच हाताळयावर साबणाने हात धुणे
- पिण्याच्या पाण्याची सुरक्षित साठवण आणि हाताळणी

# राष्ट्रीय स्वच्छता आणि आरोग्य समर्थन व संवाद
# धोरण आराखडा २०१२-२०१७

**संवाद धोरण तीन टप्पयात विभागण्यात आले आहे :**

**१- जागृती करणे :**
शौचालय वापराचे आणि आरोग्य वर्तनाचे महत्व दृश्य स्वरूपात दर्शविण्यासाठी याची रचना आहे.

**२- समर्थन :**
प्रभावकर्ते आणि निर्णय घेणाऱ्यांना जी माहिती हवी आहे ती उपलब्ध करून देणे आणि त्यांना बोलण्यास आणि सकारात्मक बदलासाठी कृती करण्यास प्रोत्साहन देणे.

**३- वर्तन बदलासाठी संवाद :**

व्यक्ती आणि कुटुंबाना अचूक माहिती आणि योग्य समजावर आधारित निर्णय घेण्यास सबल करणे आणि सकारात्मक समाजिक नियम तयार करण्यास समाजाला प्रेरणा देणे.

**या प्रत्येक टप्पयाअंतर्गत होणाऱ्या संवादामागे विशिष्ठ हेतू आहे. यामध्ये पुढील बाबींचा स्पष्ट उल्लेख आहे :**

- माहिती स्विकारणाऱ्या व्यक्ती (कोण)
- माहितीचा आशय (काय)
- माहिती देण्यासाठी वापरण्यात येणारी पद्धत (कसे), आणि
- बदलासाठी कृती करण्यास प्रोत्साहन देण्याच्या पद्धती (कृती)

समर्थन, आंतरव्यक्ती संवादाच्या आधार प्रसार माध्यमे, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यामांसह बहु-माध्यमांच्या मदतीने समाजाला कृती करण्यास तयार करणे हे साध्य केले जाऊ शकते.

धोरण आराखडयात अंमलबजावणी आराखडयाची विस्तृत माहिती दिली आहे ज्यात मुख्य लाभार्थी. त्या प्रत्येकासाठी वापरावयाच्या कृती आणि आवश्यक संवाद साधने यांचा समावेश आहे. नियमित पडताळणीचा समावेश असलेल्या संनियंत्रण आणि मूल्यमापन आराखडयामुळे स्थानिक पातळीवर धोरणात अधिक चांगल्या सुधारणा करण्यास वाव मिळतो. प्रत्येक टप्पयातील सूचकांकी/निदर्शकांची निष्पती, प्रतिलाभ आणि प्रक्रिया या तीन पातळयांवर रचना केला आहे.

जिल्हा संवाद योजनेचा साचा एकूण आराखडयाला सहाय्यक आहे. ही योजना संवाद कृती आराखडा विकसित करण्यासाठी आणि जिल्हा, तालुका आणि गाव/ग्रामपंचायत पातळीवर अंमलबजावणीसाठी आवश्यक पायऱ्यांची रूपरेषा देते. यामध्ये संवाद, उपक्रम पुढे नेण्याची आणि विविध पातळयांवर क्षमता बांधणी करण्याची जबाबदारी कोणाची असेल याची ओळख करून देणे आणि आवश्यक संवाद साधने आणि दुरूस्तीसाठी उपाय योजना करण्यासाठी संनियंत्रण आणि मूल्यमापन हाती घेणे यांचा समावेश आहे.

## माहिती शिक्षण संवादासाठीच्या तरतुदी अंतर्गत विभागणीचे स्वरूप :

| माध्यम | माहिती-शिक्षण-संवादासाठी आर्थिक तरतुदीची |
|---|---|
| आंतरव्यक्ती संवाद आणि लोकांना बदलास तयार करणे (सर्व आंतरव्यक्ती संवाद छापील साहित्य, प्रोत्साहनपर भत्ता आणि वॉशसाठी नियुक्त आघाडीच्या फळीतील सर्व कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण) | ६०: पर्यंत (आंतरव्यक्ती संवाद साहित्य छपाईसाठी कमाल मर्यादा - १०%) |
| बाहय माध्यमे (भितीचित्रे, फलक) लोक माध्यम | १५% पर्यंत |
| प्रसार माध्यमे - टिव्ही रेडिओ, छापील आणि डिजिटल माध्यमे | १५% पर्यंत (छपाई कमाल मर्यादा ३%) |
| माहिती-शिक्षण-संवाद उपक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन | ५% |
| धोरण तयार करण्यासाठी पुरावा निर्मिती (संशोधन/माहिती-दृष्टीकोन-व र्तन केएपी) अभ्यास | ५% |

या धोरणांतर्गत ज्या वर्तनाचा पुरस्कार/प्रचार करायचा आहे ते घरावर आधारित वर्तन असून त्याबाबत कुटुंबस्तरावर निर्णय घेण्याची गरज आहे. आंतरव्यक्ती संवाद आणि बदलासाठी समाजाला तयार करण्याचे उपक्रम हे घर आधारित वर्तनावर परिणाम करणारे प्रभावी मार्ग आहेत असे संवाद संशोधनात आढळले आहे. म्हणूनच या धोरणात माहिती-शिक्षण-संवादासाठीच्या आर्थिक तरतुदीत आंतरव्यक्ती संवादासाठीच्या तरतुदीवर भर दिला आहे.

# संचाची ओळख

स्वच्छता आणि पाण्याला जीवनात विशेष महत्व आहे. आपण आपल्या जीवनात स्वच्छता आणि पाण्याला अग्रक्रम देवून अनिवार्य केले तर आपल्या जीवनाला चांगली दिशा देता येवू शकते. पाणी आणि जीवनाचा परस्पर संबंध आणि पाण्याचे अनन्यसाधारण महत्व तर आपण सारेच जाणतो.



लोकांमध्ये पाणी आणि स्वच्छतेविषयी जागरूकता आणण्यासाठी युनिसेफ-मुंबई तसेच पाणी आणि स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) महाराष्ट्र यांनी मिळून आई.ई.सी.साठी ३० प्रकारचे साहित्य तयार केले आहे. ह्या साहित्यात अभ्यासखेळ, फ्लिपबुक, हस्तपुस्तिका, पोस्टर/होर्डिंग, फोल्डर इ. चा समावेश आहे. या साहित्यासाठीच्या लक्ष्य गटात महिला, पुरुष, मुले, किशोरवयीन तसेच किशोरी-युवक, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समीती, शिक्षक व गांवातील लोकांचा समावेश आहे.



आम्ही आशा करतो की, या साहित्याचा वापर सर्व गावांतून आणि गावातील विविध समाज घटकांमध्ये करू शकू. त्याचबरोबर या साहित्याव्दारे दिलेले संदेश गावपातळीवर लोकांना सोप्या पध्दतीने समजावण्याचा प्रयत्न होईल. सोबत या साहित्याच्या मदतीने आम्ही आमच्या गावांसाठी नविन साहित्यही तयार करू शकू.





धन्यवाद!

# अनुक्रमणिका


| क्र.सं. | चित्र | विवरण आई.ई.सी. साहित्य | पान क्र. |
|---|---|---|---|
| | | **ॲक्टीविटी गेम** | **2-33** |
| 1 |  | नावः बिल्डींग ब्लॉक्स - हात धुण्याच्या पध्दती<br>लक्ष्य गटः शाळेतील मुले<br>सहजकर्ताः शाळेचे शिक्षक आणि BRC, DWSM, शिक्षणाधिकारी | 4-6 |
| 2 |  | नावः ६ बॉक्स पजल गेम - साबण आणि पाण्याने हात स्वच्छ धुवा<br>लक्ष्य गटः महिला आणि पुरूष<br>सहजकर्ताः Frontline workers | 7-9 |
| 3 |  | नावः बोर्ड गेम -बाळाच्या विष्ठेचे सुयोग्य व्यवस्थापन<br>लक्ष्य गटः मोठी मुले (१०-१५ वर्षे)<br>सहजकर्ताः शाळेतील मुले, Frontline workers | 10-13 |
| 4 |  | नावः सॉर्टिंग गेम - हागणदारीमुक्त गावाचे महत्व.<br>लक्ष्य गटः संपूर्ण गाव<br>सहजकर्ताः **VWSC, Frontline workers, BRC, DWSM,** आरोग्य कार्यकर्ता | 14-17 |
| 5 |  | नावः पॉकेट चार्ट गेम - पाण्याची सुरक्षा<br>लक्ष्य गटः महिला आणि पुरूष<br>सहजकर्ताः Frontline workers, BRC | 18-21 |
| 6 |  | नावः पॉकेट चार्ट गेम - हात धुण्याचे फायदे<br>लक्ष्य गटः शाळेतील मुले<br>सहजकर्ताः शाळेतील शिक्षक आणि **BRC, DWSM,** शिक्षणाधिकारी | 22-25 |
| 7 |  | नावः रेड-ग्रिन पाकेट चार्ट - मासिक पाळी<br>लक्ष्य गटः महिला<br>सहजकर्ताः बचत गट, आरोग्य आणि अंगणवाडी कार्यकर्ती | 26-29 |

| क्र.सं. | चित्र | विवरण आई.ई.सी. सामग्री | पान क्र. |
|---|---|---|---|
| 8 |  | नावः कार्ड गेम - चला जाणून घेऊ, की घाणीपासून आजार कसे पसरतात?<br>लक्ष्य गटः महिला आणि पुरूष<br>सहजकर्ताः आरोग्य सेविका, आशा, BRC | 30-33 |
| | | **फ्लिप बुक** | **35-46** |
| 9 |  | नावः फ्लिप बुक- ग्रामस्तरीय पाण्याची सुरक्षितता आणि शाश्वतता<br>लक्ष्य गटः VWSC, BRC, BDO, DWSM<br>सहजकर्ताः BRC, DWSM, GSDA | 38-40 |
| 10 |  | नावः फ्लिप बुक - स्वच्छ आणि निर्मल गाव<br>लक्ष्य गटः महिला आणि पुरूष/PRI(ग्राम पंचायत) /BRC/BDO)<br>सहजकर्ताः BRC, DWSM, VWSC | 41-43 |
| 11 |  | नावः फ्लिप बुक - दिव्याची गोष्ट<br>लक्ष्य गटः किशोरवयीन मुली<br>सहजकर्ताः आरोग्य सेविका आणि अंगणवाडी कार्यकर्ती, शाळेचे शिक्षक | 44-46 |
| 12 |  | नावः फड - बाळाच्या शी चे सुयोग्य व्यवस्थापन<br>लक्ष्य गटः महिला<br>सहजकर्ताः Frontline workers, VWSC | 47-48 |
| 13 |  | नावः सिक्वेन्स टूल्स - डायरिया पासून सुरक्षा<br>लक्ष्य गटः महिला आणि पुरूष<br>सहजकर्ताः आरोग्य सेविका, आशा, | 49-51 |
| | | **बुकलेट** | **53-60** |
| 14 |  | नावः पुस्तिका- शौचालय योजना व पुरूस्कार<br>लक्ष्य गटः NGO/CBO/BRC/BDO/ VWSC<br>सहजकर्ताः BRC/Frontline Workers | 56 |

| क्र.सं. | चित्र | विवरण आई.ई.सी. सामग्री | पान क्र. |
|---|---|---|---|
| 15 |  | नावः पॉकेट पुस्तिका - शौचालयाचे प्रकार<br>लक्ष्य गटः PRI(ग्राम पंचायत)/ VWSC/ BRC/ BDO)<br>सहजकर्ताः Frontline Workers, BRC | 57 |
| 16 |  | नावः पॉकेट पुस्तिका - मासिक पाळीच्या बाबत माझे मत<br>लक्ष्य गटः किशोरवयीन मुली<br>सहजकर्ताः आरोग्य सेविका आणि अंगणवाडी कार्यकर्ती, शाळेचे शिक्षक | 58 |
| 17 |  | नावः पॉकेट पुस्तिका - सांडपाणी व घनकचरा संपत्तीचे व्यवस्थापन<br>लक्ष्य गटः PRI (ग्रामपंचायत)/ DWSM/BDO, BRC<br>सहजकर्ताः VWSC, BRC, DWSM | 59 |
| 18 |  | नावः पॉकेट पुस्तिका - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार<br>लक्ष्य गटः शाळा व्यवस्थापन समिती, शाळा शिक्षक<br>सहजकर्ताः शिक्षणाधिकारी, BDO, BRC, DWSM | 60 |
| पोस्टर / होर्डिंग | | | 61-65 |
| 19 |  | नावः पोस्टर - शौचालयाचे महत्व आजारपण कमी होते<br>लक्ष्य गटः पुरूष आणि महिला<br>सहजकर्ताः Frontline Workers, VWSC | 61-65 |
| 20 |  | नावः पोस्टर - सुरक्षासाठी शौचालय<br>लक्ष्य गटः पुरूष आणि महिला<br>सहजकर्ताः Frontline Workers, VWSC | 61-65 |
| 21 |  | नावः पोस्टर - आर्थिक कारणासाठी<br>लक्ष्य गटः पुरूष आणि महिला<br>सहजकर्ताः Frontline Workers, VWSC | 61-65 |
| 22 |  | नावः पोस्टर - सन्मानासाठी शौचालय<br>लक्ष्य गटः पुरूष आणि महिला<br>सहजकर्ताः Frontline Workers, VWSC | 61-65 |

| क्र.सं. | चित्र | विवरण आई.ई.सी. सामग्री | पान क्र. |
|---|---|---|---|
| 23 |  | नाव: पोस्टर- मुलांमुलींसाठी वेगवेगळे शौचालय (महत्व)<br>लक्ष्य गट: शाळा व्यवस्थापन समिती<br>सहजकर्ता: शिक्षक BRC, DWSM, शिक्षणाधिकारी | 61-65 |
| 24 |  | नाव: पोस्टर - सॅनिटरी नॅपकीन वापरण्याची पद्धत<br>लक्ष्य गट: किशोरवयीन मुली, महिला आणि शिक्षक<br>सहजकर्ता: BRC, Frontline workers, शिक्षक, DWSM | 61-65 |
| 25 |  | नाव: पोस्टर - सॅनिटरी नॅपकीन विल्हेवाट लावण्याची पद्धत<br>लक्ष्य गट: किशोरवयीन मुली, महिला आणि शिक्षक<br>सहजकर्ता: BRC, Frontline workers, शिक्षक, DWSM | 61-65 |
| 26 |  | नाव: पोस्टर - शालेय स्वच्छतेचे सहा महत्वाचे घटक<br>लक्ष्य गट: शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षक<br>सहजकर्ता: शिक्षणाधिकारी, BDO, BRC, DWSM | 61-65 |
| 27 |  | नाव: होर्डिंग - वेळेवर पाणी पट्टी जमा करा<br>लक्ष्य गट: गावपातळीवर<br>सहजकर्ता: VWSC, SHG, Frontline workers, BRC | 65 |
| **मॉनिटरिंग टूल** | | | **67-71** |
| 28 |  | नाव: मॉनिटरिंग टूल - स्वच्छ व निर्मल गावसाठी नियोजन टप्पे<br>लक्ष्य गट: संपूर्ण गाव<br>सहजकर्ता: VWSC, Frontline workers, BRC, DWSM, आरोग्य कर्मचारी | 69-70 |
| 29 |  | नाव: होर्डिंग - निर्मल कार्यालय<br>लक्ष्य गट: फक्त कार्यालयासाठी<br>सहजकर्ता: कार्यालय | 71 |
| **फोल्डर** | | | **73-75** |
| 30 |  | नाव: फोल्डर - मासिक पाळीतील आरोग्य म्हणजे काय?<br>लक्ष्य गट: युवक आणि पुरुष<br>सहजकर्ता: | 75 |

# ॲक्टीव्हिटी गेम

# ॲक्टीव्हिटी गेम

## ओळख:

समूहामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आई.ई.सी. (माहिती, शिक्षण आणि संवाद) तसेच बी.सी.सी (व्यवहार परिवर्तन संवाद) साहित्य एक महत्वपूर्ण माध्यम आहे. व्यवहार परिवर्तनासाठी बोर्ड गेम, मॉनिटरींग टूल्स, पजल, पोस्टर्स, फ्लिप बूक आणि बूकलेट असे विविध प्रकारचे साहित्य आहे. ज्यामुळे लोकांमध्ये माहितीचा स्तर वाढवून जागृती निर्माण केल्या जावू शकते.

**खेळांबाबत आपली भूमिका व्यापक जागृतीची असून या खेळांचा मुख्य उद्देश पुढील प्रमाणे आहे-**

- मनोरंजाच्या माध्यमातून माहितीचा प्रसार करणें.
- कठीण विषयांना सोप्या रंजक पध्दतीने साध्या भाषेत समजावून सांगणे.
- मुख्य विषयांकडे लोकांचे लक्ष वेधून घेणे.
- लोकांना खेळांच्या माध्यमातून सहभागी करून घेवून त्यांचा मुख्य उपक्रमातील सहभाग वाढविणे.

**किटमध्ये खाली दिलेल्या खेळांचा समावेश केलेला आहे.**

- बिल्डींग ब्लॉक्स (हात धुण्याच्या पध्दती)
- सहा बॉक्स पझल (हात कधी कधी धुवावेत?)
- बोर्ड गेम (मुलांच्या विष्ठेचे योग्य व्यवस्थापन)
- सर्टिंग गेम (हागणदारीमुक्त गावाचे महत्व)
- पॉकेट चार्ट (घरामधील सुरक्षित पाणी)
- पॉकेट चार्ट ( हात धुण्याचे फायदे )
- रेड ग्रीन पॉकेट चार्ट (मासिक पाळी विषयी माहिती)
- कार्ड गेम (अस्वच्छतेमुळे होणारे आजार)

# बिल्डींग ब्लॉक्स (हात धुण्याच्या पध्दती)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थिंना हात धुण्याच्या योग्य पध्दती बाबत माहिती देवून हाताच्या स्वच्छतेसंबंधी चर्चा करणे

**वेळ:** ४५ मिनिटे

**आवश्यक साहित्य:** ८ ब्लॉक्स (सगळयाच ब्लॉक्स मध्ये पिना लावलेल्या आहेत.)

सत्र पूर्व तयारी: सहजकर्त्यानी अभ्यास खेळ घ्यावयाच्या आधी आपल्या जवळचे साहित्य विशेष करुन ८ ब्लॉक्स व त्या मध्ये पिना लावलेल्या आहेत याची खात्री करावी.

**खेळाची पध्दत:**

- अभ्यास खेळाची सुरूवात करण्यापुर्वी सगळया लोंकांशी उपरोक्त विषयावर चर्चा करुन वातावरण निर्मिती करावी.
- प्रशिक्षणार्थिंना खेळाचा उददेश स्पष्ट करावा.
- प्रशिक्षणार्थिंच्या संख्येनुसार गट पाडावे. प्रत्येक गटात ६-८ पेक्षा जास्त सदस्य घेऊ नयेत.
- गटात ८ ब्लॉक्स दयावेत.
- गटाच्या हाती दिलेल्या विविध ब्लॉक्सवरील चित्रात काय दिसते आहे विचारुन स्पष्ट करायला सांगावे.
- प्रशिक्षणार्थीना चित्रे ओळखण्यात अडचणी येत असतील तर त्यांना सहकार्य करावे.
- गटाला देण्यात आलेले ब्लॉक्स एकावर एक ठेवून हात धुण्याच्या कमांनुसार खालून वर एक सरळ ईमारत / मनोरा बनविण्याची सूचना दयावी

(लक्षात असू द्या कि ठोकळयाने सरळ इमारत बनविताना हातात साबन घेतलेले चित्र किंवा ठोकळा सर्वात खाली तर पाणी व साबनाने हात धूत असलेले चित्र सर्वात वरच्या बाजूस  हा योग्यक्रम आहे)

- जेव्हा एका सरळ रेषेत सर्व ठोकळे लावून इमारत  उभी राहील तेव्हा खालून वर पर्यंतच्या चित्रात साबनाने हात धूताना कोणत्या गोष्टींची खबरदारी घेणे आवश्यक आहे याबद्दल सहभागींना विचारा.
- चर्चेच्या पूर्वी प्रशिक्षणार्थिंची उपरोक्त विषयाबाबतची  समज जाणून घेण्याचा प्रयत्न करा.
- एखादया मुद्दयाबाबत चर्चेच्या वेळेस वाटले की एखादया विषयावर अधिक चर्चा व्हावी तर सहजकर्त्यांने सहभागींसोबत चर्चा घडवून आणावी व

विषयासंबंधी त्यांची समज वाढवावी.

❖ चर्चा संपविण्याआधी सहजकर्त्याने खात्री करुन घ्यावी की प्रशिक्षणार्थिंनी काय समजून घेतले आहे, तसेच प्रमुख मुददयांबाबत आढावा घ्यावा.

## चर्चेचे मुददे:

❖ हात स्वच्छ धुण्याच्या बाबतीत आपण काय समजू शकला ?
❖ साबनाने हात धूताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात ?
❖ साबनाने हात धूण्याचे काय फायदे आहेत ?
❖ हात धुण्याच्या छोटया छोटया गोष्टी कोणत्या?जसे नखे, अंगठे धुणे इत्यादी.

## सहजकर्त्याकरिता सूचना

❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थिंला बोलण्याची संधी देवून चित्रांबाबत काय वाटते ते विचारा.
❖ एका वेळेस एकाच प्रशिक्षणार्थीला बोलण्याची संधी द्यावी आणि त्यांची समज जाणून घ्यावी.
❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थिंला प्रश्न विचारावा व त्यावर चर्चा करावी.
❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थीकडून मांडलेल्या मुददयांचा आदर करावा.
❖ सहजकर्त्याकडे अभ्यासखेळाला अनुसरुन एखादे उदाहरण असेल तर ते निश्चितच मांडावे व प्रशिक्षणार्थिंकडुन त्या बाबतच्या सकारार्थी व नकारार्थी मुददयांवरती चर्चा करावी.


## बिल्डींग ब्लॉक्स तयार करण्याची पध्दत-
## बिल्डींग ब्लॉक्स (हात धुण्याची पध्दती)

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | ३x३ इंच |
| बॉक्स मध्ये प्रयोगासाठी साहित्य | - | एच.आई.पी. प्लास्टिक |
| बॉक्ससाठीं स्टीकर्स | - | लैमिनेटेड गमिंग शीट |

# <u>हल</u>



# सिक्स बॉक्स पझल (हात स्वच्छ धुण्यासाठी साबण आणि पाणी वापरा)



**उद्देश:** साबणाने कोणकोणत्या वेळी हात धुणे आवश्यक आहे यासंबंधी चर्चा करून हात धुण्याच्या सवयी संबंधी जागरुकता वाढविणे.

**वेळ:** ४५ मिनिटे

**आवश्यक साहित्य:** सिक्स बॉक्स फ्रन्ट बॅक पझल .

**खेळण्याची पध्दत:**

- ❖ अभ्यासखेळ घेण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी सोबत उपरोक्त विषयावर चर्चा करून वातावरण निर्मिती करावी.
- ❖ अभ्यासखेळ घेण्याचा उद्देश स्पष्ट करावा.
- ❖ सहभागींच्या संख्येनुसार गट तयार करून प्रत्येक गटात ६-८ सदस्य असतील असे पहावे. प्रशिक्षणार्थींना बॉक्स वर रेखाटलेले चित्र ओळखू दया आणि त्यात त्यांना काय दिसते ते स्पष्ट करायला सांगा.
- ❖ सहभागींना बॉक्सवरील चित्रांचे निरिक्षण करु दया. त्या त्या चित्रात दिसणा-या बाबी विचारुन त्यांना चित्र समजल्याची खात्री करून घ्या.

(या ६ ब्लॉक्सवरील चित्रात एक महिला शौचालयातुन बाहेर येत आहे, एक महिला स्वयंपाक करीत आहे., एक महिला जेवण करीत आहे, एक महिला बाळाची शी धुत आहे, महिला घराची साफसफाई करीत आहे, किशोरी मुलगी सॅनेटरी पॅड कच. ऱ्याच्या कुंडीत टाकत आहे तर दुस-या बाजूने सहाही ब्लॉक्स एकत्र करून त्यावर साबणाने हात धूत असल्याचे चित्र आहे)

- ❖ गटाला चित्र ओळखण्यात अडचण येत असेल तर सहजकर्त्याने सहकार्य करावे.
- ❖ गटाला देण्यात आलेले बॉक्स अशा प्रकारे जोडावे की, बॉक्स वर दिसत असलेले अर्धवट चित्र पुर्ण होईल.
- ❖ ६ बॉक्स वर एकत्रितरित्या रेखाटलेल्या चित्रांबाबत प्रशिक्षणार्थी कडून माहित करून घ्या; चित्रात साबनाने हात धुत असल्याचे चित्र आहे.
- ❖ आता प्रशिक्षणार्थींना ६ बॉक्स मागील बाजुनी पाहण्यास सांगावे.
- ❖ प्रशिक्षणार्थीकडुन माहित करून घ्या की, त्यांना काय दिसत आहे? (चित्रात दाखविल्याप्रमाणे कोणकोणत्या वेळेस साबणाने हात धुणे किती आवश्यक आहे याकडे त्यांचे लक्ष वेधा.)
- ❖ प्रशिक्षणार्थी समवेत ६ बॉक्स च्या मागील व पुढील बाजूच्या चित्राबाबत चर्चा करा.
- ❖ चर्चाकरण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थींना विषयाबाबत कितपत माहिती आहे हे

समजून घेण्याचा प्रयत्न करा आणि त्यानुसार माहिती दया.

- चर्चेदरम्यान एखादया विषयावर अजून चर्चा करण्याची आवश्यकता आहे असे वाटले तर प्रशिक्षणार्थी सोबत सखोल चर्चा करावी. त्यांना हा विषय समजला असल्याची खात्री करुन घ्यावी.

सत्र संपविण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थींकडून आढावा स्वरूपात जाणुन घ्या कि, त्यांनी विषयाबाबत काय समजून घेतले आहे?एखादा मुदद्ा पुन्हा मांडावा लागत असल्यास उजळणी स्वरूपात विषयातील प्रमुख मुदद्े मांडावेत.

### चर्चेसाठी मुदद्े:

- हात केव्हा केव्हा धुवावे?
- हात स्वच्छ धुणे म्हणजे काय ?
- हात स्वच्छ धुतल्यामुळे तुम्हाला कसे वाटते ?
- साबनाने हात धुताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?.
- साबनाने हात धुण्याचे काय फायदे आहेत?

### सहजकर्त्याकरीता सूचना:

- सगळ्या प्रशिक्षणार्थींना बोलण्याची संधी दयावी, तसेच त्यांना या चित्रातून काय समजले ते समजून घ्यावे.
- प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकानेच बोलावे असे सांगावे.
- चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.

सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरणे असतील तर ती नमूद करावीत. त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी. सत्र घेताना लक्षात असु दया की, प्रशिक्षणार्थी नि:संकोचपणे व सहज वातावरणात प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

### सिक्स बॉक्स तयार करण्यासंबंधी माहिती:

| | | |
|---|---|---|
| बॉक्स चा आकार | - | ३ x ३ इंच |
| बॉक्स मध्ये प्रयोगासाठी साहित्य | - | एच.आई.पी. प्लास्टिक |
| बॉक्स साठी प्रयोग स्टीकर | - | लैमिनेटेड गमिंग शीट |
| बॉक्स मध्ये लावलेल्या स्टीकरचा आकार | - | ६ x ९ इंच असावा. |
| स्टीकरची छपाई | - | चार रंगांत |
| सिक्स बॉक्स पजल बॅगचा कपडा | - | मॅटी |

# हल


हात स्वच्छ
धुण्यासाठी
साबण आणि
पाणी वापरा
शौचाहून आल्यावर
जेवण बनविण्यापूर्वी
जेवण करण्यापूर्वी
बाळाची शी पुतल्यानंतर
घराची स्वच्छता केल्यानंतर
केरकचरा टाकल्यानंतर

# बोर्ड गेम (बाळाच्या विष्ठेचे सुयोग्य व्यवस्थापन)



**उद्देश:** उघडयावर शौच केल्यामुळे किटाणू किंवा विषाणू जेवणाद्वारे तोंडात कसे जातात आणि छोटया बाळाच्या शी ची योग्य विल्हेवाट कशी लावावी याबाबतीत चर्चा करणे.

**वेळ:** १ तास

**आवश्यक साहित्य:** फ्लॅक्स बोर्ड, ७ चित्र लागलेले गोल कांउन्टर्स, व १२ कार्डस्

**आवश्यक तयारी:** सहजकर्त्याने अभ्यास खेळ सुरू करायच्या आधी खेळाशी संबंधीत कार्डस व गोल कान्उटर्स उपलब्ध आहेत याची खात्री करून घ्यावी.

**अभ्यासखेळाची प्रक्रिया:**

- ❖ अभ्यासखेळ सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षकाने विषयाशी संबंधीत वातावरण निर्मिती करावी ,
- ❖ आपण हा अभ्यासखेळ का घेत आहोत त्याबाबतचे उद्देश स्पष्ट करावे.
- ❖ उपस्थित सहभागी प्रशिक्षणार्थींच्या संख्येनुसार गट तयार करावेत. एका गटात ६ ते ८ सदस्य असावेत.
- ❖ गट केल्यानंतर गटकार्या करीता काउन्टर्स व कार्डसचे वाटप करावे.
- ❖ गटातील प्रशिक्षणार्थीना वाटप करण्यात आलेले काऊन्टर्स व कार्डस् वरील चित्र ओळखुन प्रत्येकास सांगण्यास सुचवावे की त्यांनी चित्रात काय पाहिले?उदा .काऊन्टर्स व कार्डवर रेखाटलेल्या चित्रात दर्शविलेले आहे कि, एक मुलगा उघडयावर शौच करीत आहे, दुषित किंवा अस्वच्छ हात, माशी, उघडयावर पडलेली मानवी विष्ठा, पिण्याचे पाणी तळयावरून भरणे, शिजवलेल्या अन्नावर माशा बसलेल्या व तेच अन्न एक मुलगा खात आहे.

कार्डवर रेखाटले आहे १) एक छोटे बाळ शी करीत आहे, एक स्त्री त्या बाळाची शी कपडयाने स्वच्छ करीत आहे किंवा पुसुन घेत आहे, महिला बाळाची शी काढुन शौचालयात टाकत आहे, स्त्री आपले हात साबनाने धुत आहे, २) बाळाने खोलीत शी केली आहे, व त्यावर एक स्त्री राख टाकत आहे, स्त्री बाळाची शी उचलून शौचालयात टाकत आहे, स्त्री आपले हात साबनाने धुत आहे, ३) बाळाने घराबाहेर शी केली आहे. स्त्री बाळाला शौचालयात शी करण्यासाठी मदत करीत आहे, स्त्री शौचानंतर बाळाचे हात साबनाने धूत आहे, स्त्री बाळाच्या शी वर पाणी टाकुन शौचालयाचे भांडे स्वच्छ करीत आहे.

- ❖ गटातील प्रशिक्षणार्थी काऊन्टर्स व कार्डस वरील चित्र ओळखू शकले नाही तर त्यास चित्र ओळखण्यासाठी मदत करावी.

# बोर्ड गेम (बाळाच्या विष्ठेचे सुयोग्य व्यवस्थापन)

- ❖ गटासमोर फ्लैक्स बोर्ड अंथरावा व पहिल्या वर्तुळात उघडयावर शौच करीत असलेल्या मुलाचे चित्र व त्याच्या समोरच्याच बाजुस शेवटच्या गोलात भोजन करीत असलेल्या मुलाचे चित्र लावावे.
- ❖ आता गटातील सदस्यांच्या मदतीने काऊन्टर वर्तुळात अश्या पध्दतीने ठेवावे की, आजार किंवा रोगराई पसरवणारे विषाणू, जिवाणू, किटाणू, उघडया मानवी विष्ठेवर बसून भोजन करीत असलेल्या व्यक्तीच्या उघडया अन्नावर व घेत असलेल्या घासासोबत तोंडावाटे पोटात कसे जातात हे दर्शवू शकतील. ही सर्व प्रक्रिया चित्राद्वारे समजून घेता येईल.
- ❖ गटामार्फत सर्व काऊन्टर ठेवल्यानंतर प्रश्न विचारा की, त्यांनी ह्या काऊन्टर्सना येथे का ठेवले ?
- ❖ एखादया गटाने वर्तुळावर चुकीचे काऊन्टर ठेवले असतील तर त्यास स्वत: दुरूस्त न करता इतर गटासमवेत चर्चा करून दुरूस्त करावे.
- ❖ आता उघडयावरील शौच, विष्ठा व त्यावर बसलेल्या किटाणू, विषाणूमुळे पसरणारे आजार यावर चर्चा करावी.
- ❖ गटासोबतच्या चर्चेनंतर दिलेल्या कार्डना चौकोनी आकारातील रकान्यात वयानुसार बाळाची विष्ठा व त्याची सुरक्षित विल्हेवाट कशी करावी त्याक्रमानुसार कार्ड ठेवण्यास सांगा.
- ❖ गटाचे सर्व कार्ड ठेवले की त्यांना विचारा हे कार्ड येथे का ठेवले गेले?
- ❖ एखादया गटामार्फत एखादे कार्ड चौकोनामध्ये चुकीचे ठेवले गेले असेल तर त्यास स्वत: सरळ न करता इतर गटांना विचारावे, चर्चा करावी व क्रमानुसार ठेवण्यास सांगावे.
- ❖ गटाशी चर्चाकरून जाणून घ्यावे की, बाळाच्या शी ची सुरक्षित विल्हेवाट कशी लावावी ?
- ❖ चर्चा करण्यापुर्वी प्रशिक्षणार्थीना संबंधित विषयाबाबत माहिती आहे का, हे जाणून घेणे आवश्यक आहे.
- ❖ चर्चेदरम्यान जर सहजकर्त्यास वाटले की प्रशिक्षणार्थीसोबत याबाबतीत अजून चर्चा करण्याची आवश्यकता आहे तर त्यांनी सखोल चर्चा करावी आणि त्यांना काय समजले याबाबतीत जाणून घ्यावे.
- ❖ सत्र संपविण्यापूर्वी विषयांशी संबंधीत जी माहिती देण्यात आली त्यातील प्रमुख बाबी कोणत्या होत्या ? याबद्दलचा संक्षिप्त आढावा सहजकर्त्याने प्रशिक्षणार्थींकडून समजून घ्यावा.

# बोर्ड गेम (बाळाच्या विष्ठेचे सुयोग्य व्यवस्थापन)

**चर्चेचे मुद्दे:**

- ❖ उघडयावरील शौच्यावर बसलेले किटाणू, विषाणू कोणत्या मार्गाने आपल्या तोंडावाटे भोजनाच्या माध्यमातून रोगराई पसरविण्याचे कार्य करतात ?
- ❖ उघडयावर शौच करण्यासंबंधी आपले काय मत आहे?
- ❖ उघडयावर शौच करण्याची कोणकोणती ठिकाणे आहेत?
- ❖ उघडयावर शौच करण्यासंबंधी कोणकोणत्या अडचणी आहेत?
- ❖ उघडयावर शौच केल्याने कोणकोणत्या रोगांचा प्रसार वाढू शकतो?
- ❖ बाळाच्या शौचाची सुरक्षित विल्हेवाट कशी केली पाहिजे?

**सहजकर्त्यांसाठी सुचना:**


- ❖ सर्व प्रशिक्षिणार्थींना बोलण्याची संधी दयावी व चित्रावरून त्यांची समज जाणुन घ्यावी.
- ❖ एका वेळी एकानेच बोलावे असे सुचित करावे.
- ❖ प्रत्येक प्रशिक्षिणार्थीला प्रश्न विचारावेत व चर्चा करावी.
- ❖ चर्चा होताना प्रशिक्षिणार्थींच्या विचारांचा आदर करावा.
- ❖ सहजकर्त्याकडे जर संबंधित विषयानुरूप काही उदाहरणे असतील तर ती चर्चेत आणावीत व त्याबाबतच्या सकारात्मक व नकारात्मक पैलूवर चर्चा करावी.

**बोर्ड गेम तयार करण्याची माहिती-**

**बोर्ड गेम (एफ डायग्राम)**

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | ५० x २४ इंच |
| बॉक्समधील प्रयोग साहित्य | - | १३ आउन्स फ्रन्ट लैट फ्लैक्स |
| कार्डाची छपाई | - | चार रंगाचें डिजिटल फ्लैक्स. |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डातील प्रयोग पेपर | - | ३०० जी.एस.एम. आर्ट कार्ड. |
| कार्डाची छपाई | - | चार रंगात |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| डिस्क साइज | - | ९० मि.मी. |
| डिस्कमध्यें प्रयोग स्टीकर | - | लैमिनेटेड गमिंग शीट |
| स्टीकरची छपाई | - | चार रंगांत |
| बोर्ड गेम बॅग चा कपड़ा | - | मॅटी |

# हल



# सार्टिंग गेम (हागणदारीमुक्त गावाचे महत्व)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थी समवेत हागणदारी मुक्त व निर्मल ग्राम बाबत चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिट

**आवश्यक साहित्य:** फलैक्स बोर्ड, १२ कार्डस असलेला सेट. (ज्यात ६ सकारार्थी व ६ नकारार्थी व्यवहाराबाबतची कार्डस आहेत.)

**पूर्वतयारी:** सहजकर्त्याने अभ्यासखेळ सुरू करण्यापूर्वी खात्री करून घ्यावी की त्याच्याकडे १२ कार्ड चा सेट आहे. त्यामध्ये ६ सकारार्थी व्यवहार व ६ नकारार्थी व्यवहार दर्शवणारी कार्डस आहेत.

**अभ्यास खेळ प्रक्रिया-**

- अभ्यासखेळ सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी बरोबर उपरोक्त विषयावर बोलावे व चर्चेसाठी वातावरण निर्मिती करावी.
- प्रशिक्षणार्थीनां अभ्यास खेळ घेण्यामागचे उद्‌देश स्पष्ट करावेत.
- प्रशिक्षणार्थीचे संख्येनुसार गट पाडावेत. (एका गटात १२ जण असावेत)
- गटात सर्वांना कार्ड वाटून दयावेत.
- गटातील सदस्यांना एक एक करून सर्व चित्र पाहुन ते ओळखुन त्यात काय पाहिले ते विचारावे; चित्रात हागणदारी मुक्त गावासंबंधी सकारार्थी व्यवहार दर्शविणारे कार्डस आहेत. शौचालयाचा वापर केल्याने वयोवृध्द माणसांसाठी सोयीचे होते, लहान मुलांना रोगराई पासून वाचविता येते, कुटुंबात पैशाची बचत हाते, परिसर स्वच्छ व वातावरण निरोगी राहते, किशोरी आणि महिलांसाठी सुरक्षित आणि गरोदर महिलांनाही सुरक्षितता राहते. नकारात्मक व्यवहाराच्या कार्डसमध्ये उघडयावर शौच केल्यामुळे हिंस्त्र जनांवरांपासून भीती, मुले आजारी पडणे, रोग पसरणे, वयोवृध्दांना पावसाळयात संडास करण्यासाठी घरापासून दूर जावे लागणे, किशोरी आणि महिला व गरोदर स्त्रिया यांची असुरक्षितता, दुषित पाण्यापासून आजार पसरणे आणि औषधोपचाराचा खर्च वाढणे अशी चित्रे आहेत)
- गट सदस्य जर चित्र ओळखू शकले नाहीत तर चित्र ओळखण्यासाठी त्यांना मदत करा.
- सर्व प्रशिक्षणार्थींच्या मध्यभागी एक फलॅक्सबोर्ड अंथरुन बोर्डवर रेखाटलेले चित्र ओळखण्यास व त्यात काय दर्शिवलेले आहे ते सांगण्यास सुचवावे.

# सार्टिंग गेम (हागणदारीमुक्त गावाचे महत्व)

- गट सदस्यांना आता उघडयावर शौच करण्यापासून प्रतिबंध किंवा ग्रामस्थांचे सकारार्थी व्यवहाराचे कार्ड हिरव्या रंगाच्या वर्तुळात असलेल्या चौकोणात ठेवण्यास सांगावे. व नकारार्थी व्यवहाराच्या कार्डना लालरंगाच्या वर्तुळाच्या चौकोणात ठेवण्यास सुचवावे.
- जेव्हा प्रशिक्षणार्थी सर्व कार्ड ठेवतील तेव्हा त्यांना विचारा हे कार्ड येथे का ठेवले?
- जर एखादया गटाने कार्ड चुकीच्या ठिकाणी ठेवले तर त्यांना तुम्ही स्वत: बरोबर न करता, इतर गट सदस्यांबरोबर चर्चा करून दुरुस्त करून घ्यावे.
- प्रशिक्षणार्थी समवेत उघडयावर शौच करण्याची सवय बंद करून गाव निर्मल करण्याबाबत चर्चा करावी.
- चर्चा करण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थींना संबंधित विषयाला अनूसरून कितपत माहिती आहे. हे जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.
- चर्चेदरम्यान सहजकर्ता म्हणून आपणास वाटले की, एखादया विषयावर प्रशिक्षणार्थी समवेत अधिकची चर्चा करावी तर गटासमवेत सखोल चर्चा करून प्रश्न विचारून जाणून घ्यावे की, त्यांना विषय किती समजला आहे?
- सत्र संपविण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थींकडून आढावा स्वरूपात जाणून घ्या की, त्यांनी विषयाबाबत काय समजून घेतले आहे?जर एखादा मुदद्दा पुन्हा मांडावा लागला तर एकदा उजळणी स्वरूपात विषयातील प्रमुख मुदद्दे मांडावेत.

**चर्चेसाठी मुदद्दे:**

- उघडयांवर शौच करण्याबाबत आपणास काय वाटते ?
- उघडयावर शौच केल्यामुळे कोणकोणत्या समस्या उद्‌भवतात?
- उघडयावर शौच केल्यामुळे कोणकोणते आजार पसरतात?
- निर्मल ग्राम पासून दूर ठेवणारे नकारार्थी वर्तन कोणते?
- निर्मल ग्राम करण्यासाठीचे सकारार्थी वर्तन कोणते?
- निर्मल ग्राम होण्याच्या दृष्टीने आपण कोणकोणत्या सवयी बदलल्या पाहिजेत?

# सार्टिंग गेम (हागणदारीमुक्त गावाचे महत्व)

## सहजकर्ता करीता सुचना:

- प्रत्येक प्रशिक्षणार्थींना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेऊन त्यावर चर्चा करावी.
- चित्राबाबतची प्रशिक्षणार्थींची समज जाणून घ्यावी.
- प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकास बोलण्यास सुचवावे.
- चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- जर सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. व त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी. सत्र घेताना लक्षात असु दया की, प्रशिक्षणार्थी निसंकोचपणे व सहज वातावरणात प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

## सॉर्टिंग गेम निर्मीतीबाबत माहिती-


### सॉर्टिंग गेम

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | २४ x ३० इंच |
| बोर्डात प्रयोग मीडिया | - | १३ आउन्स फ्रन्ट लैट फ्लैक्स. |
| बोर्डाची छपाई | - | चार रंगांत फ्लैक्स डिजिटल छपाई |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डाचा प्रयोग पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| कार्डाची छपाई | - | चार रंगांत. |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| सर्टिंग गेम बॅगचा कपड़ा | - | मॅटी. |

# हल



# पॉकेट चार्ट (पाण्याची सुरक्षा)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थी समवेत पाणी सुरक्षेच्या महत्वाविषयी चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिटे

**आवश्यक साहित्य:** प्लास्टिक पॉकेट असलेला चार्ट, पाणी सुरक्षेबाबतचे महत्व सांगणारा २५ कार्डाचा सेट.

**अभ्यास खेळ प्रक्रिया:**

अभ्यास खेळ घेण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थी समवेत विषयासंबंधी चर्चा करून वातावरण निर्मिती करावी.

- ❖ हा अभ्यासखेळ का घेत आहोत याबाबतचे उददेश स्पष्ट करावेत.
- ❖ प्रशिक्षणार्थी संख्येनुसार गट पाडावे.(एका गटात १० ते १२ लोक असावेत)
- ❖ गटात हात धुण्याच्या बाबतीत चित्राचे २० कार्ड वाटून दया आणि ज्यामध्ये फक्त प्रश्न लिहिलेले आहेत असे ५ कार्ड आपल्या जवळ ठेवा.
- ❖ गटाला चित्र ओळखून सांगण्यासाठी प्रवृत्त करा की त्यांना चित्रात काय दिसत आहे?
- ❖ प्रशिक्षणार्थी चित्र ओळखू शकले नाहीत तर त्यांना चित्र ओळखण्यात मदत करा.
- ❖ सर्व प्रशिक्षणार्थिंच्या मध्यभागी प्लास्टिक पॅकेट चार्ट लटकवा.
- ❖ प्लास्टिक पॉकेटवाल्या चार्टवर वरून खालच्या ओळीत फक्त प्रश्न लिहिलेले कार्ड लावावे. व कार्डवर काय लिहिलेले आहे त्यासंबंधी समजावून सांगा.
- ❖ एक एक कार्ड काढा त्यावर लिहलेला मजकूर वाचून त्याच्याशी संबंधीत असलेले कार्ड ज्या गटाकडे आहेत. त्यास लिहिलेले कार्ड समोर डाव्या बाजुने उजवीकडे प्लास्टिक पॅकेट चार्टमध्ये लावण्यास सांगा.
- ❖ जेव्हा गट ते कार्ड तेथे लावेल तेव्हा त्याना विचारा की, ते कार्ड त्यानी तेथे का लावले आहेत.
- ❖ जर एखादया गटाकडून चुकीचे कार्ड ठेवले गेले तर ते स्वत: बरोबर न करता, गटाशी चर्चा करून बरोबर करून घ्या.
- ❖ चर्चा करण्यापूर्वी प्रशिक्षणार्थिंची हया विषयाबाबतची समज व माहिती जाणून घ्या.

# पॉकेट चार्ट (पाण्याची सुरक्षा)

❖ सहजकर्ता म्हणून आपणास वाटले की, उपरोक्त विषयी आणखी चर्चा करण्याची गरज आहे तर प्रश्न विचारून चर्चा घडवा. विषय सर्वांना समजला आहे याची खात्री करून घ्या.

❖ प्रशिक्षणार्थींची विषय समजून घेण्याची क्षमता व त्यांच्याकडील उपलब्ध वेळ यानुसार ठरवावे की, सर्व विषयाची एकाच बैठकीत चर्चा करून पूर्ण करावी की, का जास्त बैठका घ्याव्यात ?

❖ सत्र संपविण्यापूर्वी बैठकीत देण्यात आलेल्या माहिती बाबत प्रशिक्षणार्थी कडून आढावा स्वरूपात जाणून घ्या की, त्यांना विषय व त्यातील महत्वाचे मुदद्दे समजलेले आहेत. गरज असल्यास पुन्हा एकदा प्रमुख मुदद्यांची उजळणी करावी.

## चर्चेचे मुदद्दे :

❖ पाणी सुरक्षा म्हणजे काय ?

❖ पिण्याच्या पाण्याचे असुरक्षित स्त्रोत कोणकोणते आहेत?

❖ पिण्याचे पाणी अशुध्द कसे होते?

❖ अशुद्ध पाणी पिल्याने कोणकोणते आजार प्रसार पावतात?

❖ पिण्याचे पाणी कोणकोणत्या पध्दतीने सुरक्षित ठेवू शकतो?

## सहजकर्तासाठीच्या सुचना :

❖ सर्व प्रशिक्षणार्थींना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवून त्यावर चर्चा करावी.

❖ चित्राबाबतची समज जाणून घ्यावी.

❖ प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकास बोलण्यास सुचवावे.

❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.

❖ जर सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरणे असतील तर ती नमूद करावी. त्यांच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी. प्रशिक्षणार्थी नि:संकोचपणे व सहज वातावरणात प्रशिक्षणात सहभागी होत आहेत याकडे लक्ष दया.

# पॉकेट चार्ट (पाण्याची सुरक्षा)


पॉकेट चार्ट तयार करण्याची माहिती
पॉकेट चार्ट (कुटंब पातळीवर पाण्याची सुरक्षा)

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | २५ x ४० इंच |
| बोर्डच्यां प्रयोगाचा कपड़ा | - | मॅटी आणि ०.५ माईक्रोन प्लास्टिक शीट) |
| बोर्डासाठी पाकेट | - | २५ |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डाचा प्रयोग पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| कार्डाची छपाई | - | चार रंगांत. |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| सर्टिंग गेम बॅगचा कपड़ा | - | मॅटी. |

# हल



# पॉकेट चार्ट (हात धुण्याचे फायदे)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थी समवेत हात धुण्याचे महत्व याबाबत चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिटे

**आवश्यक साहित्य:** प्लास्टिक पाकिट असलेले चार्ट व हात धुण्यासंबंधीची माहिती असलेला २० कार्डसचा संच

**अभ्यास खेळाची पध्दत:**

- ❖ अभ्यास खेळ घेण्यापूर्वी विषयाबाबत प्रशिक्षणार्थीशी चर्चा करावी. हा अभ्यास खेळ का घेत आहोत त्याचा उद्देश स्पष्ट करून वातावरण निर्मिती करावी.
- ❖ प्रशिक्षणार्थीच्या संख्येच्या आधारावर गट करावे.
- ❖ हात धुण्याबाबतचे चित्र व माहिती आहे अशी २० पैकी १६ कार्ड प्रशिक्षणार्थी मध्ये वाटावीत उर्वरित चार कार्डस ज्यावर प्रश्न लिहलेले आहेत ती सहजकर्त्याने स्वत: जवळ ठेवावीत. गटाला दिलेल्या कार्डवरील चित्र ओळखून त्यात त्यांनी काय पाहिले ते विचारावे.
- ❖ गट चित्र ओळखु शकला नाही तर ते ओळखण्यासाठी त्यांना मदत करावी.
- ❖ सर्व गट सदस्यांसमोर चित्र असलेले चार्टचे प्लास्टिक पॅकेट मध्यभागी ठेवावे.
- ❖ प्लास्टिक पॅकेटच्या चार्टवर वरून खाली ओळीने प्रश्न लिहिलेले कार्ड लावलेले आहेत. प्रशिक्षणार्थीना ते कार्ड दाखवावे व विचारावे की, कार्डवर काय लिहीले आहे?
- ❖ एक एक कार्ड उचलून वाचावे व लिहिलेल्या कार्डाशी संबंधीत चित्र असलेले कार्ड जी गटाजवळ आहेत. ती त्यांना त्याच्या समोर असणा-या (डाव्या बाजुने उजव्या बाजुकडे) प्लास्टिक पॅकेटमध्ये लावण्यास सांगावे.
- ❖ गटामार्फत सर्व कार्ड लावले जातील तेव्हा प्रशिक्षणार्थिना विचारावे की, हे कार्ड येथे का लावण्यात आलेले आहेत.
- ❖ एखादया गटामार्फत चुकीचे कार्ड ठेवण्यात आले असतील तर ते स्वत: व्यवस्थित न करता इतर गटांबरोबर चर्चा करून कार्डाची सुसंगत मांडणी करावी.
- ❖ चर्चा घडवून आणण्यापूर्वी प्रशिक्षणार्थी कडून विषयाबाबतची समज जाणून घ्यावी.

# पॉकेट चार्ट (हात धुण्याचे फायदे)

- ❖ सहजकर्ता म्हणून संबंधीत विषयावर अधिक चर्चेची गरज आहे असे वाटले तर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करून विषय समजले किंवा नाही हे जाणून घ्यावे.
- ❖ प्रशिक्षणार्थींची समजून घेण्याची क्षमता आणि वेळ यानुसार एका सत्रात एक विषय अथवा सर्वच विषय मांडता येवू शकतील का ते अंदाज घेवून नियोजन करावे.
- ❖ सत्र संपविण्यापूर्वी आढावा घेवून मांडलेला विषय प्रशिक्षणार्थींना कितपत समजला हे जाणून घ्या. शेवटी पुन्हा मुख्य मुद्दयांवर चर्चा करुन सत्र संपवा.

**चर्चेसाठी मुद्दे:**

- ❖ हात स्वच्छ धुण्याबद्दल तुम्हाला काय वाटते?
- ❖ हात केंव्हा केंव्हा स्वच्छ धुतले पाहिजे?
- ❖ हात स्वच्छ न धुण्याने कोणकोणते आजार होतात?
- ❖ हात स्वच्छ धुण्याचे काय फायदे आहेत?
- ❖ अस्वच्छ हातामधून विषाणू किंवा किटाणू आपल्या शरीरात कसे शिरकाव करतात ?

**सहजकर्तासाठीच्या सुचना:**

- ❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थीला बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवून त्यावर चर्चा करावी.
- ❖ चित्राबाबतची समज जाणून घ्यावी.
- ❖ प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकास बोलण्यास सांगावे.
- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा, सर्व प्रशिक्षणार्थीसोबत चर्चा करावी व प्रश्न विचारावेत.
- ❖ सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरणे असतील तर ती नमूद करावीत त्या अनुषंगाने सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी
- ❖ सत्र घेताना लक्षात असू दया की, प्रशिक्षणार्थी नि:संकोचपणे व खुलेपणाने प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

# पॉकेट चार्ट (हात धुण्याचे फायदे)

पॉकेट चार्ट तयार करण्याची पध्दत:

पॉकेट चार्ट (हात धुण्याचे फायदे):

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | २३ x ३४ इंच |
| बोर्ड तयार करण्यासाठी लागणारे साहित्य | - | लाल रंग में मैटी और ०.५ माइक्रोन प्लास्टिक शीट |
| बोर्डासाठी पाकेट | - | २० |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डासाठी पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| कार्डाची छपाई | - | चार रंगांत. |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| पॉकेट चार्ट बॅगसाठी कपड़ा | - | मॅटी. |

# <u>हल</u>



# रेड-ग्रिन पॉकेट चार्ट (मासिक पाळी)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थी समवेत मासिक पाळीच्या काळातील वैयक्तिक स्वच्छता व त्यासंबंधी असलेले समज गैरसमज यावर चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिटे

**आवश्यक साहित्य:** प्लास्टिक पॅकेट असलेला लाल व हिरवा चार्ट. मासिक पाळीच्या काळातील वैयक्तिक स्वच्छता व त्यासंबंधीचे समज गैरसमज यावर आधारीत १२ कार्डस्चा सेट

**खेळाची पध्दत:**

- अभ्यास खेळ सुरू करण्यापूर्वी उपरोक्त विषयावर प्रशिक्षणार्थी सोबत चर्चा करून वातावरण निर्मिती करावी.
- हा अभ्यास खेळ का घेतोय त्यामागील उद्देश स्पष्ट करावा.
- प्रशिक्षणार्थी संख्येनुसार गट पाडावे.
- कार्डवर रेखाटलेल्या चित्रांच्या सहाय्याने त्यातील आशयासंबंधी सहभागींमध्ये चर्चा घडवून आणावी आणि विषय समजण्यास मदत करावी. (रेखाटलेल्या चित्रात मासिक पाळीच्या काळात करावयाची वैयक्तिक स्वच्छता व त्याच्याशी संबंधीत समज गैरसमजला अनुसरून सकारार्थी वर्तन दर्शवणारे किंवा व्यक्त करणारे कार्ड उदा... मैत्रीणी सोबत खेळ खेळणे, सॅनटरी पॅड अथवा स्वच्छ सुती कापडाचा वापर, तसेच त्यांची सुरक्षित विल्हेवाट, दररोजचा शारीरिक व्यायाम, शाळेला जाणे, ताजे व पौष्टीक अन्न खाणे, डॉक्टरी सल्ला घेणे.) नकारात्मक वर्तनाचे वर्णन करणारे कार्ड (उदा...... घराबाहेर जाऊ नये, मासिक पाळी काळातील वापरलेले कपडे गोठ्यात वाळवले पाहिजे, लोणच्याच्या भरणीला हात लावू नये, आंघोळ करू नये, एकांतात राहायला आवडते.)
- गटातील सदस्यांनी जर चित्र ओळखले नाही तर त्यासाठी त्यांची मदत करावी.
- गटाच्या मध्यभागी रेड आणि ग्रिन चार्ट असलेले प्लास्टिकचे पॅकेट ठेवावे अथवा सर्वांना पाहता येईल असे समोरच्या भिंतीवर लटकवावे.
- गटातील सदस्यांकडून सकारार्थी व्यवहार नमूद असलेले कार्ड हिरव्या प्लास्टिकच्या पॅकेटमध्ये ठेवून घ्यावे व नकारार्थी व्यवहार कार्ड लाल पाकिटमध्ये ठेवून घ्यावीत.
- गट जेव्हा सर्व कार्ड ठेवून देईल तेव्हा त्यांना विचारावे की, आपण केलेल्या सदर वर्गीकरणामागे आपली भूमिका काय आहे?

# रेड-ग्रिन पॉकेट चार्ट (मासिक पाळी)

- ❖ गटातील सदस्यांनी कार्ड ठेवताना चूकीच्या पध्दतीने ठेवले असतील तर तुम्ही स्वत: दुरूस्त न करता इतर गट सदस्यांना प्रश्न विचारून, चर्चा करून बरोबर ठेवण्यास मदत करावी.
- ❖ गटासमवेत मासिक पाळीच्या काळात करावयाच्या वैयक्तिक स्वच्छतेसंबंधी व संबंधीत समज-गैरसमजावर चर्चा घडवून आणावी.
- ❖ चर्चेपूर्वी प्रत्येक सदस्याला विषयासंदर्भात असणारी माहिती व समज किती आहे जाणून घ्यावे?
- ❖ चर्चेदरम्यान सहजकर्ता म्हणून आपणास वाटले की, एखादया विषयावर प्रशिक्षणार्थी समवेत अधिक चर्चा करावी तर गटासमवेत सखोल चर्चा करावी. शेवटी प्रश्न विचारून जाणून घ्यावे की, त्यांना विषय किती समजला आहे?
- ❖ प्रशिक्षणार्थीचे विषयाबाबतचे ज्ञान, समज व उपलब्ध वेळ यावरुन विषयाची चर्चा एकाच बैठकीत करावी की, आणखी बैठका घेवून एकेक विषय घ्यावा हे ठरवावे.
- ❖ सत्र संपविण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थीकडुन आढावा स्वरूपात जाणून घ्या की, त्यांनी विषयाबाबत काय समजून घेतले आहे?जर एखादा मुदद्ा पुन्हा मांडावा लागत असेल तर एकदा उजळणी स्वरूपात विषयातील प्रमुख मुदद्े मांडा.

**चर्चेसाठी मुदद्े:**

- ❖ मासिक पाळी बाबतची आपली संकल्पना काय?
- ❖ मासिक पाळीच्या काळातील वैयक्तिक स्वच्छतेमध्ये कोणकोणत्या गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत?
- ❖ किशोरी व महिलांचे या काळातील भोजन कसे असायला पाहिजे?
- ❖ मासिकपाळीशी संबंधीत कोणकोणते समज/गैरसमज आहेत व त्यामागील वास्तव काय आहे?

**सहजकर्त्यासाठीच्या सुचना:**

- ❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थीना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवून त्यावर चर्चा करावी.
- ❖ सहभागींची चित्राबाबतची समज जाणुन घ्यावी.

# रेड-ग्रिन पॉकेट चार्ट (मासिक पाळी)

- ❖ प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकास बोलण्यास सुचवावे.
- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- ❖ सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी. सत्र घेताना लक्षात असू दयावे की, प्रशिक्षणार्थी नि:संकोचपणे व सहज वातावरणात प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

**रेड एण्ड ग्रीन पॉकेट चार्ट निर्मीतीविषयी माहिती :**


**रेड एण्ड ग्रीन पॉकेट चार्ट (मासिक पाळीतील स्वच्छता- समज/गैरसमज)-**

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | ३२ x १९ इंच |
| बोर्डासाठी कपड़ा | - | २ रंग (हिरव्या आणि लाल रंगाचा मैटी और ०.५ माईक्रोन प्लास्टिक शीट) |
| बोर्डाची छपाई | - | ८ लाल आणि ८ हिरव्या रंगाचे |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डासाठी पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| कार्डाची छपाई | - | चार रंगांत. |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| रेड एण्ड ग्रीन पॉकेट चार्ट बॅगसाठी कापड | - | मॅटी. |

# हल



# कार्ड गेम (चला जाणून घेऊ, की घाणीपासून आजार कसे पसरतात?)



**अभ्यास खेळाचा उद्देश:** प्रशिक्षणार्थी समवेत अस्वच्छतेमुळे होणा-या आजाराबाबत चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिट

**अभ्यास साहित्य:** चार्ट आणि अस्वच्छतेमुळे होणा-या आजाराबाबतचा १५ कार्डचा सेट

**पुर्व तयारी:** अभ्यास खेळ सुरू करण्यापूर्वी सहजकर्त्यांने १८ कार्डचा सेट पूर्ण आहे याची खात्री करावी.

**अभ्यास खेळाची पध्दत:**

- अभ्यास खेळ घेण्यापुर्वी सर्व प्रशिक्षणार्थी समवेत विषयासंबंधी चर्चा करून वातावरण निर्मिती करावी
- हा अभ्यासखेळ का घेत आहोत याबाबतचा उद्देश स्पष्ट करावा.
- प्रशिक्षणार्थी संख्येनुसार गट पाडावेत. अस्वच्छतेमुळे होण्या-या आजाराबाबतची माहिती व चित्र असलेले १८ पैकी १५ कार्ड गटात विभागून दयावीत.
- उर्वरीत ३ कार्ड ज्यामध्ये प्रश्न लिहिलेले आहेत ती सहजकर्त्यांने स्वत:जवळ ठेवावीत.
- गटातील प्रशिक्षणार्थींना एक एक करून चित्र ओळखण्यास सांगावे व काय पाहिले ते विचारावे.
- प्रशिक्षणार्थी चित्र ओळखू शकलें नाहीत तर चित्र ओळखण्यात त्यांना मदत करावी.
- प्लास्टिक चार्ट असलेले पॅकेट प्रशिक्षणार्थींच्या मध्यभागी ठेवावे.
- प्रशिक्षणार्थींना दिलेल्या कार्डवरील चित्र व मजकुरावर चर्चा करायला सांगून ते चार्टवरील कुठल्या शिर्षकाखाली येवू शकतील त्या प्रमाणे एकत्र करण्यास सांगावे.
- प्लास्टीक पॉकेटमध्ये घाण कोठे पसरते, रोग कसा पसरतो व कोणकोणते आजार होतात या शिर्षकाखाली चित्र टाकण्यास सांगावे. या दरम्यान चर्चा करावी आणि चित्रावरील मजकुराच्या सहाय्याने विषय समजावून दयावा.
- गटाव्द्ारे जेव्हा कार्ड लावून पूर्ण होतील त्यावेळी गटसदस्यांना हे विचारा की, त्यांनी विशिष्ठ कार्ड विशिष्ठ ठिकाणी का लावले आहेत?

## कार्ड गेम (चला जाणून घेऊ, की घाणीपासून आजार कसे पसरतात?)

- जर एखादया गटाकडून प्लास्टिक पॅकेटमध्ये चुकीचे कार्ड ठेवले गेले तर त्यास तुम्ही स्वत: बरोबर न करता समूहातील इतरांशी चर्चा करून त्यासंबंधी दुरुस्ती सूचवावी.
- चर्चेपूर्वी प्रशिक्षणार्थीशी चर्चा करून उपरोक्त विषयावरील त्यांच्याकडील उपलब्ध माहिती व त्यांची विषयाबाबतची समज जाणुन घ्यावी.
- चर्चेदरम्यान सहजकर्ता म्हणून आपणास वाटले की, एखादया विषयावर प्रशिक्षणार्थी समवेत अधिकची चर्चा करणे गरजेचे आहे तर गटासमवेत सखोल चर्चा करा आणि खात्री करून घ्यावी की, त्यांना विषय समजला आहे.
- प्रशिक्षणार्थीचे विषयाबाबतचे ज्ञान, समज व उपलब्ध वेळ यानुसार संपुर्ण विषयांची चर्चा एका वेळेस करावी की आणखी बैठका घेवून विषय घ्यावा हे ठरवा.
- सत्र संपविण्यापूर्वी सर्व प्रशिक्षणार्थीकडुन आढावा स्वरूपात जाणून घ्या की, त्यांनी विषयाबाबत काय समजून घेतले आहे?एखादा मुदद्दा पुन्हा मांडावा लागत असल्यास एकदा उजळणी स्वरूपात विषयातील प्रमुख मुदद्दे मांडावेत.

### चर्चेसाठी मुदद्दे:

- अस्वच्छता म्हणजे आपण काय समजतो?
- आपण कचरा कोठे टाकतो?
- आजाराचे किटाणु कुठे कुठे राहतात.?
- आजार पसरवणा-या किटाणुमुळे कोणकोणत्या आजाराचा प्रसार होतो?
- स्वच्छतेशी संबंधीत सकारार्थी वर्तन कुठले आहे ?

### सहजकर्तासाठीच्या सुचना:

- प्रत्येक प्रशिक्षणार्थीला बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवुन त्यावर चर्चा करावी.
- चित्राबाबतची समज जाणून घ्यावी.
- प्रशिक्षणार्थीना एकावेळेस एकास बोलण्यास सुचवावे.
- चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थीच्या बोलण्याचा आदर कारावा.
- सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरणे असतील तर ती नमुद


करावीत व त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी. सत्र घेताना लक्षात असू दयावे की, प्रशिक्षणार्थी नि:संकोचपणे व सहज वातावरणात प्रशिक्षणात सहभागी होत आहेत.

**कार्ड गेम तयार करण्याची माहिती:**

**कार्ड गेम (अस्वच्छतेमुळे होणारे आजार):**

| | | |
|---|---|---|
| बोर्डाचा आकार | - | २३ x ३४ इंच |
| बोर्डाची प्रयोग सामग्री | - | १३ आउन्स फ्रन्ट लैट फ्लैक्स |
| कार्डाचा आकार | - | ४ x ६ इंच |
| कार्डासाठी पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| कार्डाची छपाई | - | चार रंगांत. |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| कार्ड गेम बॅगसाठी कपड़ा | - | मॅटी. |

# हल


चला जाणून घेऊ, की घाणीपासून आजार कसे पसरतात?
घाण कोठे कोठे पसरते?
रोग कसा पसरतो?
कोणकोणते आजार होतात?
unicef

# फ़्लिप बुक

# फ्लिप बुक

समुदायामध्ये कोणताही तांत्रिक विषय हा सोप्या पध्दतीने समजविण्याची अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. यामध्ये फ्लिप बुक हे एक प्रभावी माध्यम आहे. फ्लिप बुकमध्ये एका बाजुला चित्र असतात आणि दुसऱ्या बाजुला चित्रासंबंधीत वाक्य किंवा मजकूर असतो. सहजकर्ता सत्र घेत असतो तेंव्हा चित्राला समूहासमोर ठेवतो आणि वाक्य आपल्याबाजुने ठेवतो. चित्राला एका बाजुने दाखविले जाते आणि वाक्यांच्या सहायाने चित्र समजाविले जाते. अशा प्रकारे फ्लिप बुक मध्ये वर्णन करण्यात आलेल्या विषयावर सहभागींची समज स्पष्ट केली जाते.

**या किटमध्ये ३ फ्लिप बुक ठेवलेले आहेत :**

- फ्लिप बुक (पाण्याची सुरक्षितता आणि शाश्वतता)
- फ्लिप बुक (निर्मल आणि स्वच्छ गांव)
- फ्लिप बुक (दिव्याची गोष्ट)

या किटमध्ये दोन नवीन साहित्याचा समावेश केलेला आहे जो फ्लिप बुकला वेगळया पध्दतीने समजावून घेण्याचा एक प्रयत्न आहे.

- फड (मुलांच्या विष्ठेची व्यवस्थित विल्हेवाट)
- सिक्वेन्स टूल्स (डायरिया)

# फ्लिप बुक (ग्रामस्तरीय पाण्याची सुरक्षितता व शाश्वतता)




**माहिती जी सर्वांना असणे गरजेचे आहे:** माणसाच्या शरीरात २/३ भाग पाणी असते. पाणी हे मनुष्याच्या अत्यावश्यक गरजांपैकी एक आहे. जेव्हा पाणी वितरण व्यवस्था ढासळते तेंव्हाच पाण्याचे मूल्य व महत्व लक्षात येते. या पार्श्वभूमीवर पाण्याची सुरक्षितता व निरंतर उपलब्धतेविषयी सकारात्मक सवयींच्या बाबतीत लोकांमध्ये जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे.

**फ्लिप बुकचा वापर कोणी करावा?**

- ❖ समुदाय स्तरावर आरोग्य कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, व गावपातळीवर काम करणारे प्रेरक, कार्यकर्ते.
- ❖ समुदायासोबत चर्चा करण्यापूर्वी पूर्ण फ्लिप बुक चांगल्या प्रकारे वाचून, पाहून व समजून घ्या.
- ❖ चर्चा सुरू करण्यापुर्वी उपस्थित प्रशिक्षणार्थींना विषयाबाबत सांगून चर्चेसाठी वातावरण निर्मिती करावी.
- ❖ चर्चेदरम्यान फ्लिप बुक हातात ठेवावे. जेणेकरून सर्वांना त्यातील चित्रे स्पष्टपणे दिसतील.
- ❖ फ्लिप बुक मधील चित्र दाखवताना सर्वांना विचारावे की, त्यांना चित्र स्पष्ट दिसत आहे किंवा नाही .
- ❖ फ्लिप बुक मधील चित्रे एक एक करून क्रमवार दाखवावीत.
- ❖ गटाला चित्रात जे दिसत आहे ते ओळखून सांगायला प्रवृत्त करावे.
- ❖ गटाला चित्र ओळखताना अडचण येत असेल तर ते ओळखण्यास त्यांना मदत करावी.
- ❖ चित्र दाखवताना लांब काडी, पेन्सील, पेन, पटटी आदींचा वापर करा.
- ❖ फ्लिप बुकमधील चित्र समजावून सांगत असताना तुम्ही एक सहजकर्ता म्हणून पुढाकार न घेता त्या गटाला ते सर्व चित्र पाहून त्यातील संदेश समजून घेण्यास वेळ दयावा जेथे हया गटाला चित्र समजून घेताना अडचण येत आहे. तेथे त्यांना समजून घेण्यास मदत करा.
- ❖ चर्चेदरम्यान फ्लिप बुकच्या एका बाजुस लिहिलेला भाग आहे तर दुस-या बाजुस छोटेचित्र व माहिती लिहिलेली आहे. तुम्ही चित्रांकडे पाहुन रोचक

पध्दतीने ह्यास गोष्टी रूपात सांगू शकता. चर्चा करु शकता. फ्लिप बुकचा वापर करण्यास आपण स्वतंत्र आहात, परंतु हे ही लक्षात असू दया की, आपण वारंवार त्यात पाहुन प्रशिक्षणार्थींची विषयासंबंधीची रोचकता तर कमी करत नाही ना.

- चर्चे दरम्यान सहजकर्त्याला वाटले की, एखादया विषयाबाबत सखोल माहिती देणे गरजेचे आहे अथवा विषयांवर अधिक चर्चा होणे आवश्यक आहे तर व्हा प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करुन त्यांना विषय समजून घेण्यात सविस्तर मदत करा.
- चर्चा समाप्त करण्यापूर्वी हे सुनिश्चित करावे की, प्रशिक्षणार्थींना योग्य ती माहिती दिली गेली आहे. महत्वाच्या मुद्दयांवर चर्चा झाली आहे.

**चर्चेसाठी मुद्दे :**

- सुरक्षित पाणी म्हणजे काय?
- सुरक्षित पाण्याचे स्त्रोत कोणकोणते आहेत?
- गावपातळीवर पाणी सुरक्षिततेबाबत काय उपाय योजना केल्या जाऊ शकतात?
- कोणकोणत्या सकारात्मक व्यवहाराचे पालन करून आपण शाश्वतरित्या पाण्याचे व्यवस्थापन करू शकतो?

**सहजकर्तासाठीच्या सुचना :**

- प्रत्येक प्रशिक्षणार्थींना बोलण्याची संधी दयावी, त्यांचे प्रश्न समजून घेवून त्यावर चर्चा करावी.
- चित्राबाबत त्यांची समज जाणून घ्यावी.
- प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकानेच बोलण्याबाबत सूचित करावे.
- चर्चेदरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

# फ्लिप बुक (ग्रामस्तरीय पाण्याची सुरक्षितता व शाश्वतता)

## फ्लिप बुक निर्मीती बाबत माहिती
## फ्लिप बुक निर्मीती करताना लक्षात ठेवावयाच्या काही गोष्टी

| | | |
|---|---|---|
| फ्लिप बुकचा आकार | - | १४ x ११ इंच |
| फ्लिप बुकमध्ये वापरलेला पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकचे कवर पेज | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकची कटिंग | - | फ्लैश कट |
| फ्लिप बुकमध्ये बाइन्डिंग | - | स्पाइरल |
| फ्लिप बुकमध्ये पेज साइजच्या बरोबरीचे स्टैण्ड<br>फ्लिप बुकमध्ये १५० ते २०० माइक्रॉनची कवर पेज साइज ट्रान्सपेरेन्सी | | |
| फ्लिप बुकची छपाई | - | ४ रंगामध्ये |

# फ्लिप बुक (स्वच्छ अणि निर्मल गाव)



## माहिती जी सर्वांना असणे आवश्यक आहे:

आपल्या जीवनात स्वच्छतेच्या सवयींना खूप महत्वाचे स्थान आहे. स्वच्छतेच्या सवयीमुळे आपण निरोगी राहतो.

स्वच्छतेच्या सकारात्मक सवयीबाबत समाजात जागरूकता आणणे व त्यांनी या सवयी आपल्या दैनंदिन जीवनाचे महत्वपूर्ण अंग मानून आचारणात उतरविणे खूपच आवश्यक आहे. सोबतच अस्वच्छतेमुळे पसरणा-या रोगराईला आळा घालणे ही तेवढेच गरजेचे आहे.

## फ्लिप बुकचा वापर कोणी करावा:

समुदायपातळीवर आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्ती तसेच स्वयंसेवी संस्था कार्यकर्ते यांचा वापर करू शकतात.

## फ्लिप बुकचा वापर केंव्हा करावा:

- ओल्या व सुक्या कच-याचे व्यवस्थापन करताना.
- महिला, किशोर, किशोरी, पुरूष गट समूहासोबत, बैठकीत चर्चा करण्यासाठी, प्रशिक्षणा दरम्यान, सल्ला व मार्गदर्शन देते वेळेस.
- फ्लिपबुकचा वापर कसा करावा?
- समूह किंवा गटा समवेत चर्चा करण्यापूर्वी प्रथमत: स्वत: हे पुस्तक पूर्णपणे वाचून समजून घ्यावे.
- लोकांच्या सोयीचा विचार करून सदरील पुस्तक दोन भागात विभागण्यात आले आहे. एका बैठकीत ओल्या कच-याचे व्यवस्थापन तर दुस-या बैठकीत सुक्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत चर्चा करावी.
- प्रशिक्षणार्थींना अर्ध्या गोलाकारात बसवावे व स्वत: त्यांच्या मधोमध एका उंच स्टुलवर बसावे जेणे करून फिलप बुक सहजतेने दाखवता येईल.
- चर्चा सुरू करायच्या आधी त्यांना विषयाबाबतची माहिती दयावी व वातावरण निर्मीती करावी.
- चर्चेदरम्यान फ्लिप बुक हातात ठेवावे अथवा उंच स्थानावर अथवा टेबलवर ठेवावे. जेणेकरून ते सर्वांना पाहता येईल.
- फ्लिप बुकचा लिहलेले भाग आपल्या कडे तर चित्र असलेला भाग प्रशिक्षणार्थी कडे असावा याकडे लक्ष असू दया.

# फ्लिप बुक (स्वच्छ अणि निर्मल गाव)

- ❖ फ्लिपबुकचा चित्रावाला भाग दाखवताना सर्वांना विचारून खात्री करून घ्या की, चित्र स्पष्ट दिसत आहे.
- ❖ एक एक करून क्रमाने फ्लिप बुकमधील चित्र दाखवावित.
- ❖ प्रशिक्षणार्थींना चित्र ओळखून स्पष्ट करण्यास सांगावे की त्यांनी चित्रात काय पाहिले आहे ?
- ❖ प्रशिक्षणार्थींनी चित्र ओळखले नाही तर त्यांना ओळखण्यासाठी सहकार्य करा.
- ❖ चित्र दाखवताना कार्ड, पेन्सील, पेन, पटटी आदीचा वापर करा.
- ❖ प्रशिक्षणार्थींना फ्लिप बुक समजावून सांगण्यापूर्वी त्यांच्याकडून यासंदर्भात असणारी सर्व माहिती लक्षपूर्वक समजून घ्यावी व फ्लिप बुकमध्ये दिलेले संदेश स्वत: समजून घ्यावेत.
- ❖ आपण त्यांना समजून घेण्यात मदत करतोय असे वाटू देवू नये.
- ❖ चर्चेदरम्यान फ्लिप बुकच्या एका बाजुस लिहीलेला भाग आहे तर दुसऱ्या बाजुस छोटेचित्र व माहिती लिहीलेली आहे. तुम्ही चित्र पाहुन रोचक किंवा मजेदार पध्दतीने हयास गोष्टी रूपात सांगू शकता चर्चा करू शकता. फिलप बुकचा वापर करण्यास आपण स्वतंत्र आहात, परंतु हे ही लक्षात असू दया की, आपण वारंवार त्यात पाहुन प्रशिक्षणार्थींची विषया संबंधीची रोचकता तर कमी करत नाहीत ना.
- ❖ चर्चेदरम्यान सहजकर्त्यांना वाटले की, एखादया विषयाबाबत माहिती विषद करणे गरजेचे आहे. अथवा विषयांवर अधिक चर्चा होणे आवश्यक आहे. तर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करून त्यांना विषय कितपत समजले ते निश्चित करून घ्यावे आणि आवश्यक त्या मुद्दयावर पुन्हा माहिती दयावी.
- ❖ चर्चा समाप्त करण्यापूर्वी हे सुनिश्चित करावे की, प्रशिक्षणार्थींना योग्य ती माहिती दिली गेली आहे. महत्वाच्या मुद्दयांवर चर्चा झाली आहे.

**चर्चेसाठी मद्दे :**

- ❖ वर्तुळ म्हणजे आपण काय समजून घेतले?
- ❖ सुका कचरा म्हणजे आपण काय समजतो?
- ❖ ओल्या व सुक्या कच-याचे व्यवस्थापन कसे करावे?
- ❖ ओल्या व सुक्या कच-याचे योग्य पध्दतीने व्यवस्थापन कसे करावे?व त्याचा फायदा काय?

# फ्लिप बुक (स्वच्छ अणि निर्मल गाव)

**सहजकर्त्याकरीता सुचना:**

- सर्व प्रशिक्षणार्थिंना बोलण्याची संधी दयावी व चित्राबाबत त्यांची समज जाणून घ्यावी.
- प्रशिक्षणार्थींना एका वेळेस एकानेच बोलाण्याबाबत सुचित करावे.
- सर्व प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी व प्रश्न समजून घ्यावे.
- चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. त्याचा सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

**फ्लिप बुक निर्मिती बाबत माहिती**

**फ्लिप बुक निर्मिती करताना लक्षात ठेवावयाच्या काही महत्वाच्या बाबी**

| | | |
|---|---|---|
| फ्लिप बुकचा आकार | - | १४ x ११ इंच |
| फ्लिप बुकमध्ये वापरलेला पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकचे कवर पेजचे कार्ड | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकची कटिंग | - | फ्लैश कट |
| फ्लिप बुक बाइन्डिंग | - | स्पाइरल |
| फ्लिप बुकमध्ये पेज साइजच्या बरोबरीचे स्टैण्ड<br>फ्लिप बुकमध्ये १५० ते २०० माइक्रॉनची कवर पेज साइज ट्रान्सपेरेन्सी | | |
| फ्लिप बुकची छपाई | - | ४ रंगामध्ये |

# फ्लिप बुक (दिव्याची गोष्ट)



**माहिती जी सर्वांना असणे गरजेचे आहे:**

किशोर अवस्थेत अनेक शारिरीक, मानसिक व भावनिक बदल होत असतात.

किशोरवयीन मुलींमध्ये शारिरीक बदल होत असताना सर्वात महत्वपुर्ण बदल म्हणजे मासिक पाळीच्या चक्राची सुरूवात होय यादिवसात किशोरींना स्वच्छता व पोषण याविषयाची माहिति देऊन जागरुक करणे व जबाबदारीपूर्वक वर्तन करण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक ठरते.

फ्लिपबुकचा वापर करून किशोरी मुलींना मासिक पाळी व त्याच्याशी संबंधीत समज गैरसमजा बाबतीत तसेच हया काळात घडणा-या त्रासदायक पण सामान्य गोष्टी, सॅनेटरी पॅडचे वापर व वापरण्याची सुरक्षित पध्दत आणि योग्य विल्हेवाट बाबत माहिति दिली जाऊ शकते.

**फ्लिपबुकचा वापर कसा करावा?**

❖ फ्लिपबुकचा उपयोग करण्यापुर्वी ते प्रथमत: स्वत: पुर्णपणे लक्षपुर्वक वाचुन समजुन घ्यावे.

❖ किशोरी मुलींना अर्ध्या गोलाकारात बसवावे व स्वत: त्यांच्या मधोमध एका उंच स्टुलवर बसावे जेणे करून फ्लिपबुक सहजतेने दाखवता येईल.

❖ चर्चा सुरु करण्यापुर्वी सर्वांना विषयाबाबत समजून सांगावे व चर्चे करीता वातावरण निर्मिती करावी.

❖ चर्चेदरम्यान फ्लिपबुक हातात ठेवावे. जेणेकरून सर्वांना त्यातील चित्र स्पष्टपणे दिसतील.

❖ फ्लिपबुक मध्ये चित्र दाखवताना सर्वांना विचारावे की, त्यांना चित्र स्पष्ट दिसत आहे किंवा नाही.

❖ फ्लिपबुक मधली चित्रे एकएक करून क्रमवार दाखवावी.

❖ किशोरी मुलींना चित्रात काय दिसत आहे ते ओळखण्यास सांगावे.

❖ किशोरी मुलींना चित्र ओळखता येत नसेल तर ते ओळखण्यात त्यांना मदत करावी.

❖ चित्र दाखवताना लांब काडी, पेन्सील, पेन, पटटी आदीचा वापर करावा.

# फ्लिप बुक (दिव्याची गोष्ट)

❖ सर्व किशोरींना फिल्पबुकमधील चित्र समजावुन सांगत असताना तुम्ही एक सहजकर्ता म्हणुन पुढाकार न घेता त्या किशोरींना ते सर्व चित्र पाहुन त्यातील संदेश समजुन घेण्यास वेळ दया. जेथे हया किशोरींना समजून घेताना अडचण येत आहे. अशा ठिकाणी त्यांना समजून देण्यास मदत करा.

❖ चर्चे दरम्यान फ्लिपबुक मध्ये एका कोप-यात चित्र व त्याबाबतची माहिती नमूद केली आहे. त्या माहितीच्या आधारे तुम्ही रोचक व आकर्षक पध्दतीने विषयाची मांडणी करा.

❖ फ्लिपबुकचा वापर करण्याचे स्वातंत्र्य आपणास आहे. परंतु लक्षात असू दया की, सतत फ्लिपबुकमध्ये आपण सतत पाहत राहील्यास प्रशिक्षणार्थीचे विषयासंबंधीचे लक्ष विचलीत होवू शकते.

❖ सहजकर्ता म्हणुन चर्चा करताना प्रशिक्षणार्थींची विषयाबद्दलची समज लक्षात घ्यावी.

❖ चर्चा संपविण्यापुर्वी किशोरी कडुन मुख्य मुदंयाबाबतचा आढावा घ्यावा.

## चर्चेसाठी मुद्दे :

❖ मासिक पाळी म्हणजे काय?याबद्दल आपली नेमकी समज काय आहे ?

❖ मासिक पाळीच्या काळात होणा-या त्रासाबाबतच्या सामान्य गोष्टी कोणकोणत्या?

❖ मासिकपाळी बाबतचे समज गैरसमज काय आहेत?

❖ मासिक पाळीच्या काळातील वैयक्तिक स्वच्छतेबाबतीत कोणत्या गोष्टीकडे लक्ष दयावे?

❖ किशोरी मुलींने आपल्या आहाराबाबत कोणत्या गोष्टीकडे लक्ष दयावे?

❖ सॅनेटरी पॅडची सुरक्षित विल्हेवाट कशी केली पाहिजे?

## सहजकर्ता म्हणुन सुचना :

❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थीना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेऊन त्यावर चर्चा करावी.

❖ चित्राबाबतची समज जाणून घ्यावी.

❖ प्रशिक्षणार्थीना एकावेळेस एकाने बोलण्यास सुचवावे.

# फ्लिप बुक (दिव्याची गोष्ट)

- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- ❖ जर सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. व त्याचे सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

**फ्लिप बुक निर्मीती बाबत माहिती**

**फ्लिप बुक निर्मीती करताना लक्षात ठेवणा-या काही गोष्टी**

| | | |
|---|---|---|
| फ्लिप बुकचा आकार | - | १४ x ११ इंच |
| फ्लिप बुकमध्ये वापरलेला पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकचे कवर पेज | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम आर्ट कार्ड |
| फ्लिप बुकची कटिंग | - | फ्लैश कट |
| फ्लिप बुक बाइन्डिंग | - | स्पाइरल |
| फ्लिप बुकमध्ये पेज साइजच्या बरोबरीचे स्टैण्ड<br>फ्लिप बुकमध्ये १५० ते २०० माइक्रॉनची कवर पेज साइज ट्रान्सपेरेन्सी | | |
| फ्लिप बुकची छ्पाई | - | ४ रंगामध्ये |

# फड (बाळाच्या शी चे सुयोग्य व्यवस्थापन)



**उद्देश:** प्रशिक्षणार्थीबरोबर बाळाच्या विष्ठेची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासंबंधी चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिट

**आवश्यक साहित्य:** फड

**पुर्वतयारी:** अभ्यास खेळ सुरु करण्यापुर्वी सहजकर्त्याने काळजीपुर्वक पहावे की, फड उघडल्यावर आधी चित्र असलेला भाग समोर येईल, फडचा उपयोग करण्यापुर्वी त्यातील सर्व चित्र क्रमानुसार लक्षात ठेवावेत.

**अभ्यास खेळ प्रक्रिया:**

- ❖ अभ्यास खेळ घ्यायच्या पूर्वी सहभागींशी विषयाबाबत चर्चा करून वातावरण निर्मिती करावी.
- ❖ हा अभ्यासखेळ का घेत आहेत?त्यामागचा उद्देश स्पष्ट करावा. सर्वांना अर्धगोलाकारात बसवावे.
- ❖ थोडया उंचावर फड ठेवुन ते उघडावे जेणेकरून वर्तुळात बसलेल्या प्रशिक्षणार्थींना ते स्पष्ट दिसेल.
- ❖ उघडल्यावर प्रथम पहिले चित्र उघडावे व ते त्यांना ओळखण्यास सांगावे की, चित्रात काय दिसत आहे विचारावे.
- ❖ गटाने चित्र ओळखले नाही तर त्यास चित्र ओळखण्यास मदत करावी.
- ❖ त्या चित्रावर चर्चा करावी.
- ❖ लक्षात घ्या की, पहिल्या चित्रावर चर्चा झाल्यानंतर ते गुंडाळा आणि मग दुसऱ्या चित्रावर चर्चा करा.
- ❖ अश्या प्रकारे फड मधल्या प्रत्येक चित्रावर एकएक करून चर्चा घडवून आणा. व चर्चेपश्चात फड गुंडाळून ठेवा.
- ❖ फडमधील चित्रावर चर्चा घडवून आणा.
- ❖ प्रत्येक चित्रावर चर्चा करून संपल्यावर प्रशिक्षणार्थीपैकी दोघांना पुढे येण्यास विनंती करावी. व एका प्रशिक्षणार्थीला फडचा एक कोपरा व दुसऱ्याने दुसरा कोपरा पकडुन ठेवण्यास सांगा. व पहिले ते शेवटच्या चित्रापर्यंत क्रमवार माहिती जी आधी चर्चा केली त्याची पुन्हा एकदा उजळणी करा.
- ❖ चर्चेच्या पुर्वी प्रशिक्षणार्थींना याविषयासंबंधी कितपत माहिती होती. याबाबत जाणून घ्यायचा प्रयत्न करा.

# फ्लॅप चार्ट (बाळाच्या शी चे सुयोग्य व्यवस्थापन)

- ❖ चर्चेदरम्यान सहजकर्ता म्हणून आपणास वाटले की एखादया विषयांवर अधिकची माहिती दयावी तर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करून त्या विषयबाबतची सविस्तर माहिती देवून त्यांची समज वाढवावी.
- ❖ चर्चा संपविण्यापुर्वी प्रशिक्षणार्थी कडून आढावा घेवून चर्चा केलेल्या मुख्य मुदयांवर विचार करण्यास अवधी दयावा. जेणेकरून प्रशिक्षणार्थी चर्चेतील मुद्दे पुन्हा आठवतील काही अडचणी असल्यास निराकरण करणे शक्य होईल.

**चर्चेसाठी मुद्दे:**

- ❖ उघडयावर शौच करण्याच्या सवयीबद्दल आपणास काय वाटते?
- ❖ बाळाच्या विष्टेची सुरक्षित विल्हेवाट कशी लावली पाहिजे.?

**सहजकर्तासाठीच्या सुचना:**

- ❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थीना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवुन त्यावर चर्चा करावी.
- ❖ चित्राबाबतची सहभागींची समज जाणुन घ्यावी.
- ❖ प्रशिक्षणार्थीना एकावेळेस एकाने बोलण्यास सुचवावे.
- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर कारावा.
- ❖ सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. व त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

**फ्लॅप चार्ट निर्मिती बाबतची माहिती:**
**फ्लॅप चार्ट (बाळाच्या विष्ठेची सुरक्षितविल्हेवाट)**
**फ्लॅप चार्ट मध्ये वापरलेली पध्दती**

| | | |
|---|---|---|
| फ्लॅप चार्ट चा आकार | - | १३ औन्स फ्रन्ट लैट फ्लैक्स शीट |
| फ्लॅप चार्टच्या आकार | - | १५ x १४० इंच |
| फ्लॅप चार्ट ची छपाई | - | ४ रंगातील फ्लैक्स डिजिटल छपाई |
| फ्लॅप चार्ट मध्ये लागणा-या पाइपची लांबी | - | १ फुटाचे २ |
| फ्लॅप चार्ट मध्ये लागणा-या पाइपची जाडी | - | पौन इंचाचे-२ |
| फ्लॅप चार्ट मध्ये लागणा-या पाइपचे झाकण | - | ४ |
| फ्लॅप चार्ट मध्ये लागणारे आईलिड | - | ६ |
| पॉकेट चार्ट पिशवी चा कपडा | - | मैटी |

# सिक्वेन्स टुल (डायरीया पासून सुरक्षा)




**उद्देश:** प्रशिक्षणार्थींशी डायरीया बाबत चर्चा करणे.

**वेळ:** ४५ मिनिट

**आवश्यक साहित्य:** प्लास्टिक पॅकेट असलेला चार्ट, डायरीयाशी संबंधीत ११ कार्डस असलेला सेट.

**पुर्वतयारी:** सहजकर्त्याने अभ्यासखेळ सुरू करण्यापुर्वी खात्री करून घ्यावी की, ११ कार्डस असलेला सेट पूर्ण आहे.

**अभ्यासखेळ प्रक्रिया:**

❖ अभ्यासखेळ सुरू करण्यापुर्वी प्रशिक्षणार्थींशी संबंधीत विषयाला अनुसरून बोलावे व वातावरण निर्मिती करावी, अभ्यासखेळ का घेत आहोत त्या बाबत उद्देश स्पष्ट करावा.

❖ सर्व प्रशिक्षणार्थींना अर्ध्या वर्तुळात बसवावे. स्वत: मध्यभागी उंचावर बसावे म्हणजे सर्वांना कार्ड दाखवणे सोपे होईल.

❖ सर्वांना एकएक करून सर्व चित्रांची कार्ड दाखवून प्रशिक्षणार्थींने चित्रात काय पाहिले ते विचारावे.चर्चा करावी.

❖ प्रशिक्षणार्थी जर कार्ड ओळखू शकले नाहीत तर, त्यांना ओळखण्यात मदत करा.

❖ चर्चा पश्चात उपस्थितांच्या संख्येनूसार गट पाडावे. व गटात प्लास्टिक पॅकेट चार्ट मध्यभागी अंथरावा.

❖ प्रशिक्षणार्थींना सूचना दया की, कार्डला देण्यात आलेल्या क्रमांकानुसार एकएक करून पुढे यावं व त्याक्रमांकानुसार प्लास्टिक पॅकेट चार्ट कडे येवून आपल्या जवळील कार्डवर देण्यात आलेल्या माहितीचे वाचन सर्वांसमोर करावे. नंतर पॅकेटमध्ये कार्ड लावा. लक्षात असू दया की, गटाला कार्डवर दाखविण्यात आलेल्या क्रमानुसार चार्टवर लावावे.

❖ जेव्हा सर्व कार्ड पॅकेटमध्ये ठेवले जातील तेव्हा सत्र संपविण्यापुर्वी सत्रात देण्यात आलेली माहिती कितपत समजुन घेतली. काय एखादया मुद्दयाची उजळणी करणे आवश्यक आहे तसे करावे.

❖ जर सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयास अनुसरून एखादा अनुभव असेल तर तो सर्वांपूढे मांडावा व त्याबाबतचे सकारार्थी व नकारार्थी मुदयांवर चर्चा घडवून आणावी.

# सिक्वेन्स टुल (डायरीया पासून सुरक्षा)

- ❖ बैठक सत्र संपविण्यापूर्वी आढावा घेवून उजळणी करावी. गरजेनुसार मुख्य मुददये पुन्हा एकदा समजून दयावेत.

**सहजकर्त्याकरीता सुचना:**

- ❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थीला बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवुन त्यावर चर्चा करावी.
- ❖ चित्राबाबतची सहभागींची समज जाणुन घ्यावी.
- ❖ प्रशिक्षणार्थीना एकावेळेस एकाने बोलण्यास सुचवावे.
- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थीच्या बोलण्याचा आदर करावा.
- ❖ सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरणे असतील तर ती नमुद करावीत. त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

**सिक्वेन्स टुल निर्मीती बाबत माहिती**
**सिक्वेन्स टुल (डायरीया प्रतिबंध आणि उपाय)**

| | | |
|---|---|---|
| बोर्ड चा आकार | - | ३६ x १० इंच |
| बोर्डसाठी वापरण्यात येणारा कपडा | - | लाल रंगात मैटी आणि ०.५ माइक्रॉन प्लास्टिक शीट |
| बोर्ड मधील पाकीटे | - | ११ |
| बोर्डात लावलेली आईलिड | - | ११ |
| कार्डचा आकार | - | १.४ साइज |
| कार्डसाठी वापरलेला पेपर | - | लैमिनेटेड ३०० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| कार्डाची छ्पाई | - | ४ रंगामध्ये |
| कार्डाची कटिंग | - | फ्लैश कट |
| सीक्वेन्स टुल पिशवीचे कापड | - | मैटी. |

# हल




1



2



3



4



5



6



7



8



9



10



11

# बुकलेट

# बुकलेट

## उद्देश:


या बुकलेट मध्ये एकूण पाच पुस्तिका आहेत. स्वच्छतेच्या सकारात्मक व्यवहारा संबंधीची माहिती या पुस्तिकेत समाविष्ट आहे. या पुस्तिकेचा उपयोग स्वंयसेवी संस्था, स्थानिक सरकार आणि  समुदायाद्वारे केला जावू शकेल. स्वच्छतेच्या बाबतीत प्रशिक्षण देणे, ज्ञान वाढविणे तसेच लोकसहभाग  मिळविण्यासाठी या पुस्तिकेचा एका  तंत्रा सारखा वापर होवू शकतो. या पाच पुस्तिका खालीलप्रमाणे आहेत.

- ❖ शौचालय निर्माण करण्यासाठी वेगवेगळया योजना.
- ❖ शौचालयाचे प्रकार आणि वेगवेगळे तांत्रिक विकल्प
- ❖ मासिक पाळीच्या बाबतीत स्वच्छतेचे व्यवस्थापन
- ❖ ग्रामीणस्तरावर कचरा व्यवस्थापन
- ❖ मुलांसाठी शिक्षणाच्या अधिकाराचा कायदा

## बुकलेटचा वापर:

या पुस्तिकेचा हेतू लोक वितरणाचा असून विविध बैठका, प्रशिक्षण, आंतरवयैक्तिक सवांद ई.साठी पुस्तिका वितरित केली जात आहे.

# बुकलेट क्रमांक - १ (शौचालय योजना व पुरूस्कार)



**बुकलेटचा उद्देश:**

या पुस्तिकेमध्ये शौचालय बांधकामासंबंधी शासनाच्या योजनेबाबतीत माहिती दिलेली आहे. गावातील उघडयावर शौच करण्याची सवय बदलून लोकांनी शौचालयाचा वापर करावा आणि गाव हागणदारीमुक्त होवून निरोगी रहावे ही बुकलेटमधील संदेशाची मध्यवर्ती संकल्पना आहे. विविध स्वयंसेवी संस्था, सामुदाय स्तरावरील संस्था, गट, तालुका स्तरीय संसाधन केंद्र, तालुका विस्तार अधिकारी व व्ही. डब्ल्यु. एस. सी. सारख्या समित्यांना विनंती की, त्यांनी बुकलेट मध्ये दिलेली माहिती वाचून ती जास्तीत जास्त लोंकांपर्यत पोहचवावी. अवतीभोवतीच्या गावांना, वाडयांना, वस्त्यांना या योजनेचे लाभ मिळवून देण्यात सहकार्य करावे.


**बुकलेट कोणासाठी:**

- तालूका विकास अधिकारी,
- तालुका संसाधन केंद्र,
- स्वयंसेवी संस्था,
- समुदायस्थित गट,
- संघटन व्ही. डब्ल्यु. एस.सी.इ.

**पुस्तिका तयार करताना लक्षात ठेवण्याच्या गोष्टी:**

| | | |
|---|---|---|
| बुकलेटचा आकार | - | ए ५ साइज |
| बुकलेटचा प्रयोग पेपर | - | ९० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| बुकलेटचे कवर पेज | - | लैमिनेटेड २५० जी.एस.एम. आर्ट कार्ड पेपर |
| बुकलेटचे कटिंग | - | फ्लैश कट |
| बुकलेटचे बाइन्डिंग | - | परफेक्ट |
| बुकलेटची छपाई | - | चार रंगांत |

# बुकलेट क्रमांक - २ (शौचालयाचे प्रकार)




**उद्देश:**

अधिकतर लोक हे उघडयावर शौचास बसतात. उघडयावर शौच केल्याने साथीचे रोग पसरतात. विष्ठेची योग्य पध्दतीने विल्हेवाट रोगराई पसरविणा-या विषाणूंना आपल्या तोंडापर्यंत पोहचविण्यापासुन प्रतिबंध करतात. मानवी विष्ठा ही उघडयावर न करता शौचालयाचा वापर केला पाहिजे ज्यामुळे रोगराईचा प्रादुर्भाव होणार नाही. उघडयावर शौच करण्याचे दुष्परीणाम हे विशेष करून लहान मुलांवर खूप लवकर होतात. यात त्यांचा मृत्यूही संभवतो. या पुस्तकात शौचालय बांधकामा बाबतची माहिती दिली आहे. त्याचा उपयोग करून ग्रामस्थ गाव स्तरावर शौचालयाचे बांधकाम करू शकतात. ज्यामुळे गाव हागणदारी मुक्त होण्यास मदत होवू शकते.

ग्रामपंचायत सदस्य, व्ही. डब्ल्यु. एस. सी., बी. आर.सी, बी.डी. ओ ई. महत्वाच्या घटकांना निवेदन आहे की, त्यांनी बुकलेटमधील सर्व माहिती वाचुन त्याचे महत्व समजुन घ्यावे. आपल्या सर्वाकडुन अपेक्षा केली जात आहे की, आपण सदरील माहिती वाचुन त्याचे महत्व समजून जवळपासच्या खेडयातील लोकांनाही प्रवृत्त करावे. जेणेकरून ते ही निरोगी राहू शकतील.

**बुकलेट कोणासाठी:**

- ❖ बी.डी.ओ,
- ❖ बी.आर.सी,
- ❖ पी. डब्ल्यु. एस. सी,
- ❖ ग्रामपंचायत सदस्य
- ❖ तालुका संसाधन केंद्र
- ❖ गावपातळीवरील कार्यकर्ते

**पुस्तिका तयार करण्यासाठी लक्षात ठेवण्याच्या गोष्टी:**

| | | |
|---|---|---|
| बुकलेट आकार | - | ए ५ साइज |
| बुकलेट प्रयोग पेपर | - | ९० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| बुकलेट कवर पेज | - | लैमिनेटेड २५० जी.एस.एम. आर्ट कार्ड पेपर |
| बुकलेट कटिंग | - | फ्लैश कट |
| बुकलेट बाइन्डिंग | - | परफेक्ट |
| बुकलेट छपाई | - | चार रंगांत |

# बुकलेट क्रमांक - ३ (मासिक पाळी बाबत माझे मत)




## उद्देश:

पोंगडावस्थेत मुलांमुलींमध्ये अनेक शारिरीक, मानसिक तसेच भावनिक बदल होतात. किशोरवयीन मुलींमधील शारिरीक बदलात सर्वात महत्वपुर्ण बदल म्हणजे मासीक पाळीची सुरूवात होय. हया कालावधी दरम्यान स्वच्छता आणि आहार संबंधित माहिती उपलब्ध करून दिल्यास किशोरी मध्ये जागरूकता येवून त्यांची वागणूक जबाबदारीची होवू शकेल.

हया बुकलेटच्या माध्यमातून त्यांना मासिकपाळीच्या दिवसात होणारा त्रास व्यक्तीगत स्वच्छता, सॅनेटरी पॅडचा वापर करण्याची पध्दत तसेच आहारा ची माहिती देण्यात आली आहे.

किशोरींनी हया बुकलेटमध्ये दिलेली माहिती वाचावी आणि महत्व समजून घ्यावे. इतर मुलींनासुध्दा माहिती करून दयावी जेणेकरून आपण स्वत: व इतर मुलींसुध्दा निरोगी राहतील.

## बुकलेट कोणासाठी:


- किशोरी
- महिला
- आरोग्य सेविका
- अंगणवाडी कार्यकर्ती,
- शाळेच्या शिक्षक

## पुस्तिका तयार करण्यासाठी लक्षात ठेवण्याच्या गोष्टी:

| | | |
|---|---|---|
| बुकलेट आकार | - | ए ५ साइज |
| बुकलेट प्रयोग पेपर | - | ९० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| बुकलेट कवर पेज | - | लैमिनेटेड २५० जी.एस.एम. आर्ट कार्ड पेपर |
| बुकलेट कटिंग | - | फ्लैश कट |
| बुकलेट बाइन्डिंग | - | परफेक्ट |
| बुकलेट छपाई | - | चार रंगांत |

# बुकलेट क्रमांक - ४ (सांडपाणी व घनकचरा संपत्तीचे व्यवस्थापन)

## उद्देश:



अस्वच्छता विविध आजारांच्या लागणीचे कारण ठरते. साधारणत: ८० टक्के आजारांचे प्रमुख कारण अस्वच्छ, अशुध्द पाणी, उघड्यावरचा शौचविधी आणि अस्वच्छ परिसर आहे. या सर्व घटकांचा प्रादुर्भाव झाल्याने माणसातील रोगप्रतिकारक शक्ती घटते आणि आजारांची लागण होण्याची शक्यता बळावते.

सदर पुस्तिकेत ओल्या आणि सुक्या कच-याच्या व्यवस्थापनासंबंधी योजना स्वरुपात माहिती देण्यात आली आहे. उघड्यावरील शौचविधीमुळे रोगराईचा होणारा प्रसारही यात स्पष्ट करण्यात आला आहे. या पुस्तकाच्या सहाय्याने प्राप्त माहिती इतरांपर्यंत पोहचवण्याची विनंती करण्यात येत आहे.

## बुकलेट कोणासाठी:

- बी.डी.ओ,
- तालुका पाणी व स्वच्छता अधिकारी,
- बी.आर.सी,
- ग्रामपंचायत सदस्य,
- गाव स्तरावरील कार्यकर्ता,
- गाव पातळीवरील पाणीपुरवठा स्वच्छता कर्मचारी

## पुस्तिका तयार करण्यासाठी लक्षात ठेवण्याच्या गोष्टी:

| | | |
|---|---|---|
| बुकलेटचा आकार | - | ए ५ साइज |
| बुकलेटचा प्रयोग पेपर | - | ९० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| बुकलेटचे मुखपृष्ठ | - | लैमिनेटेड २५० जी.एस.एम. आर्ट कार्ड पेपर |
| बुकलेटचे कटिंग | - | फ्लैश कट |
| बुकलेटचे बाइन्डिंग | - | परफेक्ट |
| बुकलेटची छपाई | - | चार रंगांत |

# बुकलेट क्रमांक - ५ (बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार)



उद्देश:

स्वच्छ, सुंदर आणि निरोगी वातावरणाचा पुरस्कार करणा-या शाळा, मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करतात. स्वच्छता अनुकूल शाळा यामुळेच महत्वाच्या ठरतात. शाळेतील व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षिकांना स्वच्छतानुकूल शाळेसंबंधी माहिती व्हावी, महत्व समजावे आणि आपआपल्या शाळेला स्वच्छतानुकूल करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या हेतूने बुकलेटमध्ये माहिती दिली आहे. शाळेतील परिसराचे वातावरण निरोगी ठेवण्यासाठी या बुकलेटचा उपयोग व्हावा हा यामागे हेतू आहे.

बुकलेट कोणासाठी:

- शाळा व्यवस्थापन समिती,
- शाळेतील शिक्षक शिक्षिक

पुस्तिका तयार करण्यासाठी लक्षात ठेवण्याच्या गोष्टी:

| | | |
|---|---|---|
| बुकलेटचा आकार | - | ए ५ साइज |
| बुकलेटसाठी प्रयोग पेपर | - | ९० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| बुकलेटचे मुखपृष्ठ | - | लैमिनेटेड २५० जी.एस.एम. आर्ट कार्ड पेपर |
| बुकलेटचे कटिंग | - | फ्लैश कट |
| बुकलेटचे बाइन्डिंग | - | परफेक्ट |
| बुकलेटची छपाई | - | चार रंगांत |

# पोस्टर/होर्डिंग

# पोस्टर/होर्डिंग

**ओळख :**

समूहाच्या स्वच्छतेसंदर्भात सकारात्मक वर्तन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी चित्र एक प्रभावी माध्यम आहे. पोस्टर, चित्र यांच्या माध्यमातून दिलेल्या संदेशाद्वारे समूदायात माहितीचा प्रसार होतो. पोस्टर पुन्हा पुन्हा पाहण्यात येतात आणि त्या माध्यमातून संदेशाची आठवण दृढ होत जाते.

**उद्‌देश्य :**

शुध्द पाणी, शौचालयांचा वापर आणि स्वच्छतेसंबंधींचे अज्ञान समाजातील रोगराईचे प्रमुख कारण आहे. ८० टक्के रोगराईने ग्रस्त लोक अशुद्ध, अस्वच्छ पाण्याचे सेवन केल्याने, शौचालयाचे वापर न करता उघडयावर शौच केल्याने तसेच स्वच्छतेचे नियमांचे पालन न केल्याने आजारी पडतात व त्याची रोगप्रतिकारक शक्तीही कमी होत जाते. या पार्श्वभूमीवर शुध्द व स्वच्छ पाणी तसेच शौचालयाचे महत्व वाढते. घाणी मुळे, अस्वच्छतेमुळे आपण विभिन्न प्रकारच्या रोगांना बळी पडतो. स्वच्छता बाबतची माहिती घेऊन आपण ती आपल्या व्यवहारात आणून स्वत:ला जिव घेण्या रोगांना बळी पडण्यापासून वाचवू शकतो. यासाठीच स्वच्छता संबंधीची माहिती स्पष्ट करणारे पोस्टर बनविण्यात आले आहेत. पोस्टर च्या माध्यमातून माहिती देऊन सर्वांना निरोगी ठेवण्या बाबतचे प्रयत्न करावेत हे अपेक्षित आहे.



- ❖ शौचालयाच्या महत्वामुळे आरोग्याशी संबंधीत समस्या कमी होतील.
- ❖ शौचालयाच्या महत्वामुळे किशोरी व महिलांच्या प्रती आदरभाव व सन्मानात वाढ होईल.
- ❖ शौचालय जे कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत सुधार करेल.
- ❖ शौचालय ज्यामुळे कुंटुबाला प्रतिष्ठा व संरक्षण मिळेल.
- ❖ स्वच्छता व आरोग्य जे बाळाला निरोगी ठेवेल.
- ❖ सॅनेटरी पॅडच्या वापरासंबंधी महिलांना योग्य संदेश मिळू शकेल.
- ❖ सॅनेटरी पॅडच्या योग्य विल्हेवाटीसंबंधी महिलांना मार्गदर्शन होवू शकेल.
- ❖ स्वच्छता अनुकुल शाळा. शाळा स्तरावर स्वच्छतेसंबंधी विविध घटकांबाबतची माहिती देता येईल.

# पोस्टर/होर्डिंग

## पोस्टर लावत असताना लक्षात असु दया:

- पोस्टर समुदायात अशा ठिकाणी लावणे, चिटकवणे जेथे अधिकांश लोकांची वर्दळ किवा गर्दी असते ज्यामुळे लोकांची दृष्टी सतत पोस्टर वरील माहिती घेत राहील.
- जमीनी पासुन ६ फुटाच्या अंतरावर उंच ठिकाणी लावावे किंवा चिटकवावे जेणे करून सर्वाना ते सहज पाहता येईल.
- पोस्टर कुणाच्या घराच्या भिंतीवर लावत किवा चिटकवत असाल तर आधी त्यांची अनुमती अवश्य घ्या.
- पोस्टर जनरल स्टोअर्स, दवाखाने, पंचायतभवन, सामुदायिक केंद व शाळेच्या संरक्षणभिंतीवर लावत असाल तर सर्वप्रथम सर्व संबंधीतांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- पोस्टर चिटकवण्यासाठी चांगल्या डिंकाचा वापर करावा जेणेकरून ते लवकर निघणार नाही.
- पोस्टर नेहमी सरळ लावावे.
- एका ठिकाणी एकाच विषयांचे पोस्टर रेषेत लावावे.
- पोस्टर सपाट भिंतीवर लावावे.
- पोस्टर सर्वच सार्वजनिक ठिकाणी लावायचे नसतात तेव्हा पोस्टर लावण्यापूर्वी त्या ठिकाणासंबंधी धारणा लक्षात घ्यावी. व अनुमती घेवून पोस्टर लावण्यामागचा हेतू स्पष्ट करून मगच लावावे.
- पोस्टर अश्या ठिकाणी लावावे ज्यामुळे ते अधिक लक्ष्य गटाच्या दृष्टीस पडेल व त्यांच्या पर्यंत ती माहिती पोहचेल.

## पोस्टर तयार करण्यासाठी ध्यानात ठेवा:

| | | |
|---|---|---|
| पोस्टरचा आकार | - | २३ x ३६ इंच |
| पोस्टरचे कटिंग | - | फ्लैश कट |
| पोस्टरचा प्रयोग पेपर | - | १५० जी.एस.एम. आर्ट कार्ड |
| पोस्टरची छपाई | - | चार रंगों में |

# होर्डिंग

**उद्देश:**



पाणी माणसाच्या आयुष्यातील अविभाज्य घटकांपैकी एक आहे. याचे महत्व तेंव्हा लक्षात येते जेंव्हा पाणी वितरण व्यवस्था खंडीत होते. समुदायातील लोकांना पाणी निरंतर व शाश्वत रित्या उपलब्ध होत राहावे म्हणुन प्रत्येकाने पाणीपट्टी वेळेवर आणि न चुकता भरावी. या माध्यमातून पाण्याच्या स्त्रोतांची वेळोवेळी देखभाल दुरूस्ती करता येणे सुलभ होईल.

**होर्डिंग लावताना काय लक्षात ठेवावे?**

- होर्डिंग अश्या ठिकाणी लावावे ज्या मार्गाने लोकांची जास्त वर्दळ आहे.
- होर्डिंगला जमिनीपासून ८ फूट उंचावर लावावे जेणेकरून ते सहजरित्या पाहता येईल.
- होर्डिंगची फ्रेम मजबुत असणे आवश्यक आहे., होर्डिंग जमिनीवर गाडलेले खांब २ फूट खोल रूतवावे.
- ज्याठिकाणी होर्डिंग लावणार त्यासंबंधी जागा मालकाची अनुमती अवश्य घ्यावी.
- जेथे माणसांची जास्त वर्दळ आहे अशा ठिकाणी होर्डिंग लावावी.

**होर्डिंग तयार करताना लक्षात ठेवावयाच्या बाबी :**

| | | |
|---|---|---|
| पोस्टरचा आकार | - | १० x २० फिट |
| होर्डिंगं प्रयोग मीडिया | - | १३ आउन्स फ्रन्ट फ्लैक्स शीट |
| पोस्टरची छपाई | - | चार रंगांत फ्लैक्स डिजीटल छपाई |

# मोनिटरिंग टूल

# मानिटरिंग टूल

## मानिटरिंग टूल एक ओळख:

मॉनिटरिंग टूलच्या सहाय्याने स्वच्छतेसंदर्भातील गावस्तरावरील प्रगतीचे मूल्यमापन करता येते आणि प्रगतीसंबंधीच्या विविध टप्प्यांची सविस्तर माहिती उपलब्ध होते.

## याचे मॉनिटरिंग टूल्स खालील विषयावर आहे:

# हागणदारी मुक्त गाव

## मॉनिटरिंग टूल चा उद्देश:



मॉनिटरीग टूलच्या माध्यमातून गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी कोणकोणते आवश्यक मुद्दे पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागू शकतो याची माहिती मिळते.

या साधनाचा उपयोग करून पंचायत सदस्य आपल्या गावी हागणदारीमुक्त गावाची कार्ययोजना आणि या योजनांची सीमा सिमीत करु शकतात त्याबददलची माहिती उपलब्ध होवू शकते.

पुढील माहिती सगळयांना असायला हवी- जास्तीत जास्त लोक उघडयावर शौच करतात. उघडयावर शौच केल्यामुळे रोगांचा प्रादुर्भाव होतो. विष्ठेचा सुरक्षित निचरा आजाराचे किटाणू आपल्या तोडापर्यंत नेण्यापासून थांबवितात. त्यासाठी विष्ठेला उघडयावर टाकू नये तर शौचालयाचा वापर करावा. उघडयावर शौच केल्यामुळे अनेक प्रकारचे आजार उद्‌भवतात. ज्यामुळे लहान मुलांना लगेच बाधा होते आणि त्यात त्याचा मृत्युही होऊ शकतो.

## सनियंत्रण तक्त्याचा उद्देश

ग्रामपंचायत सदस्यांना हागणदारीमुक्त गांव करण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्वपूर्ण टप्प्यांविषयीची माहिती देणे.

## मॉनिटरींग टूल चा वापर कोण करतील?

ग्रामपंचायत सदस्य

## सनियत्रंण तक्ता केंव्हा वापरावा?

सनियंत्रण तक्त्यात देण्यात आलेले उपक्रम पुर्ण केल्या नंतर त्यात विचारण्यात आलेली माहिती ग्रामपंचायत सदस्यांमार्फत भरून घेण्यात यावी.

# मानिटरिंग टूल

❖ सनियंत्रण तक्त्याचा वापर कसा करावा?

❖ सनियंत्रण तक्ता पंचायतकार्यालयाच्या भिंतीवर लावावा.

❖ सनियंत्रण तक्ता अश्या ठिकाणी लावावा किं तो सर्वांना सहज दिसेल.

❖ सनियंत्रण तक्ता लावताना काळजीपुर्वक लक्ष दयावे की, सुचना देण्यासाठी वरच्या बाजुला जी जागा रिक्त सोडलेली आहे त्यात माहिती भरतांना त्रास होणार नाही. सहजरित्या हात पोहचेल अश्या उंचीवर तो तक्ता असावा व स्पष्ट वाचताही यावा.

❖ सनियंत्रण तक्त्यामध्ये सुचना भरताना खालुन वरच्या दिशेने भरावे.

❖ सनियंत्रण तक्ता देण्यात आलेल्या क्रमानुसार ग्रामपंचायत सदस्यांनी त्या उपक्रमांची अंमलबजावणी केली असेल तेव्हा त्या सदस्यांमार्फत ते उपक्रम पुर्ण झाल्याबाबत प्रमाणित करावे व तक्त्यात उजव्या बाजुस नमुद केलेल्या सुचनेनुसार त्यातील माहिती उदा.... उपक्रम पूर्ण केल्याचा दिनांक, नाव, पद, नमूद करावे व डाव्या बाजुच्या रकान्यात ते उपक्रम किती दिवसांत पूर्ण केले आहेत ते आकडेवारीत लिहावे.

**मॉनिटरिंग टूल तयार करण्यासाठी लक्षात ठेवण्याची गोष्टी:**

| | | |
|---|---|---|
| मॉनिटरिंगचा टूल आकार | - | ४ x ७ फुट |
| मॉनिटरिंग टूल प्रयोग मीडिया | - | फ्लैश शीट |
| मॉनिटरिंग टूलची छपाई | - | चार रंगांत |

# चेक लिस्ट पोस्टर - निर्मल कार्यालय



उद्देश: निर्मल कार्यालय ही एक उत्कृष्ट संकल्पना आहे. आपण ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणच्या स्वच्छतेचा आपण विचार केला पाहिजे. या पार्श्वभूमीवर कार्यालयस्तरावरील विविध स्वच्छता घटकांचे दायित्व कार्यालयातील कर्मचा-यांनी स्विकारणे अपेक्षित आहे. स्वच्छतेबाबत जबाबदारीने लक्ष दिले तर कार्यालय निर्मल, प्रसन्न राहू शकेल. या सहभागाचे स्वरुप विषद करणारी पडताळा सुचि (चेकलिस्ट पोस्टर) याच हेतूने येथे दिले आहे

## चेकलिस्ट पोस्टरचा उपयोग कसा करावा?

- ❖ कार्यालयातील कर्मचा-यांच्या सहमतीने कार्यालय स्वच्छतेबाबत चर्चा करुन जबाबदारीचे वाटप करावे .
- ❖ ज्या कर्मचा-याने ज्या गोष्टीच्या देखभाल व व्यवस्थापन ची जबाबदारी घेतली त्या चित्राच्या बाजूस असलेल्या गोलाकार वर्तूळात त्या व्यक्तीचे नाव, पद, विभागाचे नाव कागदावर लिहून चिटकवावे.
- ❖ या चेक लिस्ट पोस्टरला कार्यालयात दर्शनी भागात लावावे जेणेकरुन ते प्रत्येकाच्या दृष्टीस पडेल .
- ❖ कार्यालयात ज्यांनी स्वच्छता राखण्यासंबंधी जबाबदारी घेतली परंतू ती पूर्ण केली नाही अशा व्यक्तीस त्या बाबत आठवण करुन दया जेणे करुन त्याला दिलेली जबाबदारी पूर्ण होवून स्वच्छता व देखभाल योग्यरित्या होवू शकेल.

# फोल्डर

# फोल्डर - (मासिक पाळीतील आरोग्य म्हणजे काय?)




**उद्देश:**

- ❖ मासिक पाळी संबंधीच्या गोष्टींची माहिती फक्त किशोरी व महिलांनाच असावी असे नाही.
- ❖ त्यांना निरोगी ठेवण्याची जबाबदारी फक्त त्यांचीच नाही.
- ❖ यात युवकांची आणि पुरूषांचीही तितकीच महत्वपुर्ण भुमिका असायला हवी.

या फोल्डरव्द्रे पुरूषांना व युवकांनाही याबाबतची माहिती दयावी जेणेकरून त्यांनाही माहीत व्हावे की, या दिवसात वैयक्तिक स्वच्छता व पोषण काही कारणास्तव चांगल्या स्वरूपात होत नाही परिणामी महिला व किशोरी हया निरोगी राहत नाही. आपल्या जागरूक प्रयत्नाने त्याही निरोगी राहु शकतील.

हे फोल्डर वाचणाऱ्या युवकांना, पुरूषांना एकच विनंती कि, मासिकपाळी संबंधीची माहिती स्वत: समजून घेवून इतर युवक पुरूषांपर्यत पोहचवावी, इतर आरोग्याशी निगडीत मुदयाप्रमाणे या ही विषयांवर नि:संकोचपणे चर्चा करुन ही माहिती सामान्यांपर्यंत पोहचवावी. याविषयासंबंधी माहिती देताना किंवा घेताना लाज वाटून घेण्याचे कारण नाही.

**फोल्डर कोणासाठी:**

- ❖ युवकांसाठी व पुरूषांसाठी.

**सहजकर्तासाठीच्या सुचना:**

- ❖ प्रत्येक प्रशिक्षणार्थींना बोलण्याची संधी दयावी, प्रश्न समजून घेवून त्यावर चर्चा करावी.
- ❖ चित्राबाबतची समज जाणून घ्यावी.
- ❖ प्रशिक्षणार्थींना एकावेळेस एकाने बोलण्यास सुचवावे.
- ❖ चर्चे दरम्यान प्रशिक्षणार्थींच्या बोलण्याचा आदर करावा.
- ❖ सहजकर्त्याकडे उपरोक्त विषयानुरूप उदाहरण असेल तर ते नमुद करावे. त्याच्या सकारात्मक व नकारात्मक बाबींवर प्रशिक्षणार्थी समवेत चर्चा करावी.

**फोल्डर तयार करताना ध्यानात ठेवायच्या गोष्टीं:**

| | | |
|---|---|---|
| फोल्डरचा आकार | - | १३ x १० इंच |
| फोल्डरचा प्रयोग पेपर | - | १२० जी.एस.एम. |
| फोल्डरची छपाई | - | चार रंगांत |
| फोल्डरची कटिंग | - | फ्लैश कट |
| फोल्डरचा फोल्ड | - | ट्राई फोल्ड |

# नोट्स